MPSC TOPPERS

चालू घडामोडी मासिक

# एप्रिल २०१६

**IMP For MPSC | PSI | STI | Asst and many other Exams**










## मासिकातील विशेष लेख

नाविक : भारताची स्वदेशी जीपीएस यंत्रणा

हार्ट ऑफ एशिया परिषद

पुलित्झर पुरस्कार २०१६

भारत सागर परिषद

रिक परिषद

पनामा पेपर्स

टी-२० विश्वचषक २०१६









# १ एप्रिल

## देशातील पहिला हरित मेट्रो प्रकल्प

- देशातील पहिला हरित मेट्रो प्रकल्प म्हणून नागपूर मेट्रो प्रकल्पाचा विकास करण्यासाठी जर्मनीच्या केएफडब्ल्यू बँक आणि केंद्र सरकारदरम्यान करार करण्यात आला.
- या करारानुसार नागपूर मेट्रोच्या कामांसाठी केएफडब्ल्यू बँकेने २० वर्षे मुदतीसाठी ३,७५० कोटी रुपये (५०० दशलक्ष युरो) कर्ज स्वरूपात दिले आहे.
- या प्रकल्पांतर्गत सौर ऊर्जेच्या माध्यमातून दोन तृतीयांश ऊर्जा निर्मिती करण्यात येणार आहे.
- पहिल्या ५ वर्षांत एकूण रकमेवरील व्याज तर उर्वरीत १५ वर्षांत मुद्दलीसह व्याज स्वरूपात कर्ज परतावा करण्यात येणार आहे.
- या रकमेतून नागपूर मेट्रोचे डबे, मेट्रो मार्ग, वीजपुरवठा, ट्रॅक्शन, बांधकाम आदी कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी नागपूर मेट्रोरेल कॉर्पोरेशन लिमिटेड आणि केएफडब्ल्यू बँक यांच्यात दरम्यान प्रकल्प करार होईल.

---

## सिगारेट कंपन्यांनी उत्पादन थांबवले

- सिगारेटच्या पाकिटांवरील वैधानिक इशारा दर्शनी भागाच्या ८५ टक्के करण्याच्या सरकारी अधिसूचनेचा निषेध करण्यासाठी देशातील प्रमुख सिगारेट कंपन्यांनी उत्पादन थांबवले आहे.

- सिगारेटच्या पाकिटांवरील वैधानिक इशाऱ्याबाबतची केंद्र सरकारची अधिसूचना १ एप्रिलपासून अंमलात आली.
- सिगारेटसह तंबाखूजन्य पदार्थांच्या वेष्टणाच्या दर्शनी भागात तंबाखूच्या दुष्परिणामांचा इशारा किती प्रमाणात असावा, यासाठी सरकारने एक संसदीय समिती नेमली होती.
- तंबाखू उत्पादन पाकिटांच्या दर्शनी भागाच्या ५० टक्के हा वैधानिक इशारा असावा, अशी शिफारस या समितीने केली होती.
- मात्र सरकारने हा इशारा दर्शनी भागाच्या ८५ टक्के असावा, असा निर्णय घेत २४ सप्टेंबर २०१५ला त्याबाबत अधिसूचना काढली.
- या निर्णयाचा निषेध करत आयटीसी, गॉडफ्रे फिलिप्स आणि व्हीएसटी या प्रमुख सिगारेट उत्पादक कंपन्यांनी उत्पादन थांबवले. या कंपन्या टोबॅको इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या सदस्य असून एकूण सिगारेट विक्रीत त्यांचा वाटा ९८ टक्के आहे.

---

## बिहारमध्ये दारूबंदी

- बिहारमधील देशी दारूच्या विक्रीवर १ एप्रिलपासून पूर्णपणे बंदी घालण्याचा निर्णय मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी जाहीर केला होता. त्यानुसार त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.
- राज्यातील सर्व आमदारांनी दारू न पिण्याची शपथ घेतली असून, त्यांना साथ देण्यासाठी एक कोटी नागरिकांनीही तशीच शपथ घेतली आहे.

- या निर्णयामुळे राज्यातील देशी दारूची विक्री पूर्णपणे बंद करण्यात आली असून शहरी भागात विदेशी दारू मिळेल.
- संपूर्ण बिहारमध्ये विदेशी दारूची ६५० दुकाने असून, त्यातील ९० पाटण्यात आहेत. 'स्टेट बिव्हरेजेस कॉर्पोरेशन' या दुकानांवर नियंत्रण ठेवणार आहे.
- बिहारमध्ये दोन टप्प्यांत दारू बंदी लागू केली जाणार असून, त्यातील पहिल्या टप्प्याची अंमलबजावणी १ एप्रिलपासून सुरू झाली.
- दारूच्या विरोधात सरकारने कडक धोरण स्वीकारले असून, बेकायदा दारू विक्री, विषारी दारूमुळे पडणारे बळी तसेच सार्वजनिक ठिकाणी दारू पिण्यावर कठोर निर्बंध लादण्यात आले आहेत.
- हे निर्बंध मोडणाऱ्यांना मृत्युदंडापासून पाच लाख रुपयांपर्यंतचा दंड आणि तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद या संदर्भातील विधेयकात करण्यात आली असून, हे विधेयक विधानसभेत संमत झाले आहे.

---

## 'बालिका वधू' फेम प्रत्युषा बॅनर्जीची आत्महत्या

- 'बालिका वधू' या गाजलेल्या मालिकेतील 'आनंदी'ची भूमिका करणारी अभिनेत्री प्रत्युषा बॅनर्जी हिचा मृतदेह तिच्या घरात सापडला. तिने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची शक्यता वर्तवली जात आहे.
- दुपारी घरात एकटीच असताना तिने गळफास घेऊन आत्महत्या केली. दोन मित्रांनी तिला कोकीलाबेन अंबानी रूग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी तिला उपचारांपूर्वीच मृत घोषित केले.

- मूळच्या झारखंडच्या असलेल्या प्रत्युषाने यापूर्वी 'झलक दिखला जा' या मालिकेत काम केले होते. याशिवाय, 'प्यार तूने क्या किया?' ही मालिका, 'बिग बॉस'चा सातवा सीझन या कार्यक्रमांमध्येही तिने काम केले होते.

---

# २ व ३ एप्रिल

## गतिमान एक्स्प्रेस सेवेसाठी सज्ज

- देशातील सर्वांत वेगवान 'गतिमान एक्स्प्रेस'चे ५ एप्रिल रोजी अधिकृत उद्घाटन होणार आहे. ताशी १६० किलोमीटर हा या रेल्वेचा कमाल वेग असेल.
- 'गतिमान एक्स्प्रेस' सर्वप्रथम दिल्लीतील हजरत निजामुद्दीन ते आग्रा कँटोन्मेंट या मार्गावर धावणार आहे. अर्थात, नंतर या रेल्वेचे वेळापत्रक बदलले जाणार आहे.
- दिल्ली आणि आग्रा अंतर जवळपास २०० कि.मी. आहे. एवढे अंतर ही गाडी अवघ्या १०० मिनिटांत पार करणार आहे.
- या रेल्वेला बारा वातानुकूलित डबे असतील. त्यात स्वयंचलित दरवाजे, वाय-फाय अशा सुविधाही असतील. या प्रवासाचे भाडे 'शताब्दी एक्स्प्रेस'पेक्षा जास्त असेल.
- ही गाडी शुक्रवार वगळता आठवड्यातील सहाही दिवस धावणार आहे. शुक्रवारी ताजमहल बंद असतो. त्यामुळे या दिवशी ही गाडी बंद ठेवण्यात आली आहे.
- येत्या काळात कानपूर-दिल्ली, चंदिगड-दिल्ली, हैदराबाद-चेन्नई, नागपूर-बिलासपूर, गोवा-मुंबई आणि नागपूर-सिकंदराबाद अशा नऊ मार्गांवरही 'गतिमान एक्स्प्रेस' सुरू करण्याच्या प्रस्तावावर रेल्वे मंत्रालय काम करत आहे.

## मसूद अझरवरील बंदी चीनने टाळली

- पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटना 'जैश-ए-मोहम्मद'चा म्होरक्या मसूद अझरवर बंदी घालण्याचा भारताचा प्रस्तावावर चीनने नकाराधिकाराचा वापर केला.
- 'यूएन'च्या सुरक्षा परिषदेत भारताच्या प्रस्तावावर चर्चा आणि मतदान होणार होते, मात्र चीनच्या विरोधामुळे दहशतवादी अझरवरील बंदी लांबणीवर पडली.
- पठाणकोट येथे भारतीय हवाई दलाच्या तळावर जानेवारीत दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्याचा संबंध जैश आणि जैशचा म्होरक्या अझरशी असल्याचे ठोस पुरावे भारताने 'यूएन'पुढे सादर केले.
- हे पुरावे मिळाल्यामुळेच 'यूएन'ने अझरवरील बंदीच्या प्रस्तावावर सुरक्षा परिषदेत चर्चा करण्याचा निर्णय घेतला होता.
- मात्र चर्चा सुरू होण्याच्या काही तास आधीच चीनने प्रस्तावाला विरोध करण्यासाठी नकाराधिकार वापरणार असल्याचे जाहीर केले आणि चर्चा बारगळली.
- चिनी नकाराधिकारामुळे अमेरिका, फ्रान्स, रशिया आणि इंग्लंडचे समर्थन असूनही प्रस्तावावर चर्चा झाली नाही.
- नियमानुसार, सुरक्षा परिषदेत अमेरिका, फ्रान्स, रशिया, इंग्लंड आणि चीन या ५ देशांकडे नकाराधिकार आहे. यातील एका देशाने जरी नकाराधिकार

वापरला तरी सुरक्षा परिषद प्रस्ताव बाद करते. याच नियमाचा गैरफायदा घेत पाकने चीनकरवी दहशतवादी अझरवरील बंदी टाळली.

- याआधी २००१ मध्ये सुरक्षा परिषदेने दहशतवादी संघटना 'जैश-ए-मोहम्मद'वर बंदी घातली.
- मुंबईत झालेल्या २६/११च्या दहशतवादी हल्ल्यानंतर २००८ मध्ये जैशचा म्होरक्या मसूद अझरवर बंदी घालण्याचा प्रस्ताव चर्चेसाठी सादर केला होता. मात्र चीनने नकाराधिकार वापरुन हा प्रस्ताव बाद केला होता.
- आता पुन्हा एकदा नकाराधिकाराचा वापर करुन चीनने दहशतवादी अझरवरील बंदी टाळली आहे.

---

## दहशतवादाविरोधात अमेरिका आणि सौदी अरेबिया एकत्र

- पाकिस्तानातील दहशतवादी संघटना आणि व्यक्तींवर निर्बंध आणण्यासाठी अमेरिका आणि सौदी अरेबियाने हातमिळवणी केली.
- अमेरिका आणि सौदी अरेबियामधील करारानुसार पाकिस्तानातील दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोएबावरही निर्बंध येणार आहेत.
- अलकायदा, तालिबान आणि लष्कर-ए-तोएबाचा निधी रोखून त्यांचे जाळे मोडण्यासाठी अमेरिका आणि सौदी अरेबिया संयुक्तपणे कारवाई करणार आहेत.

---

# ४ एप्रिल

## प्राप्तीकर मोजण्यासाठी ऑनलाइन गणकयंत्र

- २०१६-१७ या वर्षांसाठी आपला प्राप्तीकर किती आहे हे मोजण्यासाठी प्राप्तिकर खात्याने ऑनलाइन गणकयंत्राची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.
- टॅक्स कॅलक्युलेटर हा ऑनलाइन प्रोग्रॅम असून तो प्राप्तिकर खात्याच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- त्याच्या मदतीने विवरणपत्र भरताना नेमका प्राप्तिकर किती हे समजणार आहे. करदायित्व समजण्यासाठी ही सोय केली आहे. मूलभूत माहिती व आकडे भरल्यानंतर तुम्हाला कराची रक्कम कळू शकेल.
- व्यक्तिगत पगारदार, एकत्र कुटुंब व इतर उत्पन्न स्रोत असलेल्या करदात्यांसाठी आयटीआर १ अर्ज भरायचा आहे तर विभक्त हिंदू कुटुंब व व्यक्तींसाठी आयटीआर ४ हा अर्ज भरायचा आहे.
- या वर्षी केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने अधिसूचना जारी केली असून त्यानुसार ३० मार्चला नवीन अर्ज अधिसूचित केले आहेत व ते ३१ जुलैपर्यंत सादर करता येणार आहेत.

## ई फायलिंग व्हॉल्ट

- करदात्यांना आपले ई-फायलिंग अकाउंट सुरक्षित राखता यावे यासाठी प्राप्तीकर खात्याने ई फायलिंग व्हॉल्ट ही नवी सुविधा जारी केली आहे.

- ई-फायलिंग अकाउंटवर लॉग ऑन केल्यानंतर करदात्याने ई फायलिंग व्हॉल्ट-हायर सिक्युरिटी सिलेक्ट केल्यास त्यापुढची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर या सुविधेचा लाभ घेता येईल.
- ही सुविधा घेतल्यानंतर करदात्याने यापूर्वी जरी युजर आयडी आणि पासवर्ड कोणाला दिला असला तरीही इतर कोणालाही लॉगींग करण्यापासून करदाता रोखू शकतो. केवळ युजर आयडी आणि पासवर्ड पेक्षा ही सुविधा सर्वोच्च सुरक्षा पुरवते.

## जगातील पहिले व्हाईट टायगर सफारी पार्क

- मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी ४ एप्रिल रोजी 'व्हाईट टायगर सफारी' पार्कचे उदघाटन केले. सत्ना जिल्ह्यातील मुकुंदपूरमध्ये हे व्हाईट टायगर सफारी पार्क उभारण्यात आले आहे.
- फक्त सफेद वाघांसाठी सुरु करण्यात आलेले जगातील हे असे पहिले पार्क आहे.
- येथील विंध्य भागामध्ये १०० वर्षापूर्वी पहिला वाघ आढळला होता. या पार्कच्या उभारणीसाठी ५० कोटी रुपये खर्च आला असून, २५ हेक्टर परिसरामध्ये हे पार्क पसरले आहे.
- या व्हाईट टायगर सफारी पार्कमध्ये तीन सफेद वाघ आहेत. यात एक नर आणि दोन मादी आहेत. हे पार्क आता अधिकृतरित्या पर्यटकांसाठी खुले झाले आहे. पुढच्या काही महिन्यांमध्ये या पार्कमध्ये नऊ सफेद वाघ असतील.

## अमेरिकेत अणुसुरक्षा शिखर परिषद

- अमेरिकेत झालेल्या अणुसुरक्षा शिखर बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत अणुसुरक्षेसाठी वचनबद्ध असल्याचे सांगताना काही उपाययोजना जाहीर केल्या. पन्नास देशांचे प्रतिनिधी या शिखर बैठकीस उपस्थित होते.
- अण्वस्त्रांची तस्करी रोखणे, आण्विक दहशतवाद टाळण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे यासारख्या उपाययोजनांचा त्यात समावेश आहे.
- अल कायदा व आयसिसच्या दहशतवाद्यांना अण्वस्त्रे मिळाली तर ती ते वापरतील अशी भीती अमेरिकी अध्यक्ष बराक ओबामा यांनी या बैठकीत व्यक्त केली.

## मोदी सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर

- सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर असलेले भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजे किंग सलमान बिन अब्दुल अझीझ यांच्याशी दोन्ही देशांमधील व्यूहात्मक भागीदारी अधिक विकसित करण्याच्या उद्देशार्थ चर्चा केली.
- दोन नेत्यांमधील झालेल्या दीर्घ चर्चेमध्ये व्यापार, गुंतवणूक आणि दहशतवाद या तीन मुख्य विषयांचा समावेश होता.
- सौदी अरेबिया हा भारताचा सर्वांत मोठा तेल पुरवठादार देश आहे. या चर्चेआधी मोदी यांचे रॉयल कोर्ट येथे भव्य राजनैतिक स्वागत करण्यात आले होते.

- गेल्या सात महिन्यांच्या काळामध्ये आखाती भागातील मोदी यांचा हा दुसरा दौरा आहे. याआधी, त्यांनी गेल्या ऑगस्ट महिन्यात संयुक्त अरब अमिरातीस भेट दिली होती.
- किंग सलमान यांच्याआधी मोदी यांनी सौदी अरेबियाचे परराष्ट्र मंत्री अदेल अलिजुबेर यांच्याशीही विविध विषयांवर चर्चा केली होती.
- याचबरोबर, सौदी अरेबियाच्या राष्ट्रीय तेल कंपनीचे (अराम्को) मुख्याधिकारी व आरोग्य मंत्री खालिद ए अल फताह यांनीही पंतप्रधानांची भेट घतली होती.
- जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी आणि मनमोहन सिंग यांच्यानंतर सौदी अरेबियास भेट देणारे मोदी हे चौथे भारतीय पंतप्रधान ठरले आहेत.

---

## वेस्टइंडीज दुसऱ्यांदा टी-२० विश्वकप जिंकला

- वेस्टइंडीजने कोलकतामध्ये ईडन गार्डन्सवर झालेल्या टी-२० विश्वकरंडक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात इंग्लंडला नमवून दुसऱ्यांदा टी-२० विश्वकरंडक विजेतेपद मिळविले.
- याशिवाय विंडीजच्या महिला संघानेदेखील ऑस्ट्रेलियाचा पराभव करून महिला टी-२० विश्वकरंडक स्पर्धेचे विजेतेपद मिळविले.
- यापूर्वीच्या पहिल्या विजेतेपदाचा हीरो ठरलेला मार्लन सॅम्युएल्सच यावेळी देखील त्यांच्या विजयाचा हीरो ठरला.

- अखेरच्या षटकांत १९ धावांची आवश्यकता असताना ब्रेथवेटने बेन स्टोक्सच्या पहिल्या चार चेंडूंवर चार षटकार ठोकून विंडीजचा विजय साकार केला.
- याबरोबर वेस्ट इंडिजने दुसऱ्यांदा टी-२० विश्वकप जिंकला. सॅम्युल्सला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. तर विराट कोहलीला स्पर्धेतील मालिकावीराचा बहुमान मिळाला.
- यापूर्वी वेस्ट इंडिजने १९ वर्षाखालील विश्वकप जिंकला. त्यानंतर महिला टी-२० विश्वकपही वेस्ट इंडिजने जिंकला. यानुसार वेस्ट इंडिजने यंदाच्या मोसमातल्या तिन्ही मोठ्या स्पर्धा जिंकल्या.

### महिला टी-२० विश्वकरंडकदेखील विंडीजकडे

- हेली मॅथ्यूज आणि स्टेफनी टेलर या वेस्टइंडीजच्या सलामीवीरांनी झळकाविलेल्या अर्धशतकांमुळे वेस्टइंडीजच्या महिलांनी ऑस्ट्रेलियाचा ८ गडी राखून पराभव करत पहिल्यांदाच टी-२० विश्वकरंडकावर आपले नाव कोरले.
- महिलांच्या टी-२० विश्वकरंडक क्रिक़ेट स्पर्धेत वेस्टइंडीज आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ईडन गार्डन्स मैदानावर अंतिम सामना खेळविला गेला.
- बलाढ्य ऑस्ट्रेलियाने अंतिम सामन्यात वेस्टइंडीजसमोर विजयासाठी १४९ धावांचे आव्हान ठेवले होते. हे आव्हान विंडीजच्या महिलांनी सहजरित्या पूर्ण करत आठ गडी राखून विजय मिळविला.

# ५ एप्रिल

## पनामा पेपर्स

- उत्तर व दक्षिण अमेरिका यांच्या मधोमध वसलेल्या पनामा या देशात २१ अन्य देशांतून व अधिकारक्षेत्रांतून अब्जावधी रुपये जमवण्यात आल्याचे व याद्वारे कोट्यवधींचा कर चुकवल्याचे उघड झाले.
- इंटरनॅशनल कन्सॉर्शियम ऑफ इन्व्हेस्टिगेटिव्ह जर्नालिस्ट अर्थात आयसीआयजे या गटाने ही माहिती उघड केली आहे.
- जगभरातील १०० पत्रकारांनी एकत्र येऊन ठोस पुरावे गोळा करुन यादी प्रसिद्ध केल्याचा दावा 'आयसीआयजे'ने केला आहे.
- अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावर काळ्या पैशाची निर्मिती करण्यात अनेक देशांचे प्रमुख, आंतरराष्ट्रीय दर्जाचे उद्योगपती, फिफा खेळाडू आदींचा समावेश आहे. भारतातील सिनेक्षेत्रापासून उद्योगक्षेत्रापर्यंत महनीय व्यक्तीही यात गुरफटलेल्या आहेत.
- ही सर्व रक्कम मोझॅक फोन्सेका या विधी कंपनीमध्ये ठेवण्यात आली आहे. याविषयी ११.५ दशलक्ष कागदपत्रे मिळाली असून २.६ टेराबाइट माहिती समोर आली आहे. यासाठीच याला पनामा पेपर्स असे नाव पडले आहे.
- मोठ्या प्रमाणावर कराची थकबाकी ठेवणाऱ्या जगभरातील बड्या नेत्यांची आणि सेलिब्रेटींची यादी जाहीर झाली आहे. या यादीतून अनेकांच्या प्रतिमेला धक्का बसला आहे.
- यात तब्बल ५०० नामवंत भारतीय असल्यामुळे केंद्र सरकारने यासाठी तातडीने मल्टि-एजन्सी तपासगटाची स्थापना केली आहे.

## मल्टि-एजन्सी गट

- या गटात केंद्रीय प्रत्यक्ष करमंडळ (सीबीडीटी), फायनान्शियल इंटेलिजन्स युनिट (एफआययू), फॉरेन टॅक्स अँड टॅक्स रिसर्च (एफटीअँडटीआर) व रिझर्व्ह बँक या तपास यंत्रणांचा समावेश करण्यात आला आहे.
- याखेरीज विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापनाही करण्यात आली असून हे पथक आयसीआयजेने उघड केलेल्या भारतीयांच्या यादीची तपासणी करणार आहे.

## आइसलँडच्या पंतप्रधानांचा राजीनामा

- आइसलँडचे पंतप्रधान सिगमंदर डेव्हिड गनलॉगसन व त्यांच्या पत्नीने ब्रिटिश व्हर्जिन आयलंडमधील कंपन्यांमध्ये कोट्यवधी डॉलरची गुंतवणूक केल्याचे समोर आल्याने देशात राजकीय संकट उभे ठाकले आहे.
- जर्मन वर्तमानपत्रात याविषयीचे वृत्त प्रसिद्ध होताच, सोमवारी देशाच्या संसद परिसरात हजारो नागरिकांनी निदर्शने करीत गनलॉगसन यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.
- त्यामुळे गनलॉगसन यांनी राष्ट्रपतींकडे संसद बरखास्त करण्याची परवानगी मागितली. मात्र राष्ट्रपतींनी ती फेटाळली. जनतेचा क्षोभ शांत होणार नाही, याची जाणीव झाल्याने अखेर गनलॉगसन यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला.

# आरबीआयचा पतधोरण आढावा

- २०१६-१७या आर्थिक वर्षासाठी पतधोरणाचा पहिला द्वैमासिक आढावा मांडताना भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) रेपो दरात पाव टक्का कपात केली.
- याचा थेट परिणाम म्हणून आगामी काळात कर्जे स्वस्त होतील, असा कयास आरबीआयने व्यक्त केला आहे. पतधोरणाचा यापुढील आढावा ७ जून रोजी घेतला जाणार आहे.

| पतधोरण आढावा ठळक वैशिष्ट्ये | | |
|---|---|---|
| दर | पूर्वीचा | नवीन |
| रेपो दर | ६.७५ | ६.५ |
| रिव्हर्स रेपो दर | ५.७५ | ६ |
| मार्जिनल स्टँडिंग फॅसिलिटी | ७ | ७ |
| बँक रेट | ७ | ७ |
| सीआरआर | ४ | ४ |

## बिहारमध्ये दारूवर पूर्ण बंदी

- बिहारमध्ये दारूवर (विक्री आणि प्राशन) पूर्ण बंदी घालण्यात आल्याने बिहार हे देशातील चौथे 'ड्राय स्टेट' बनले आहे. यापूर्वी गुजरात, नागालँड आणि मिझोराम या राज्यांनी दारूवर पूर्ण बंदी घातली आहे.
- याआधी बिहार सरकारने १ एप्रिलपासून देशी दारूवर पूर्ण बंदी घातली होती. या निर्णयास पाच दिवस पूर्ण होत नाही तोच नितीश सरकारने विदेशी दारूवरही बंदी घालण्याचा निर्णय.

- या निर्णयामुळे छोट्या-मोठ्या शहरांमधील हॉटेल, क्लब आणि बारमध्येही मद्यविक्री आणि प्राशनासाठी यापुढे परवाना मिळणार नसून या निर्णयामधून लष्कराच्या कॅन्टोन्मेंटला वगळण्यात आले आहे.
- बिहारमधील कंपन्या येथे मद्यनिर्मिती करू शकतात; परंतु त्यांना मद्यविक्री करता येणार नाही. इथे तयार झालेले मद्य अन्य राज्यांमध्ये विक्रीसाठी पाठवण्याची मुभा त्यांना आहे.
- ताडीपासून तयार करण्यात येणाऱ्या दारूबाबत सरकारने १९९१चा नियम लागू केला असून केवळ नीरा पिण्यास परवानगी असून ताडीला बंदी घालण्यात आली आहे. नीरा व ताडी पामच्या झाडापासून काढली जाते.

---

## जम्मू आणि काश्मीरच्या मुख्यमंत्रीपदी मेहबूबा मुफ्ती

- जम्मू आणि काश्मीरच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून पीपल्स डेमॉक्रॅटिक पक्षाच्या (पीडीपी) अध्यक्षा मेहबूबा मुफ्ती यांनी राजभवनात शपथ घेतली.
- त्यांच्यासह १६ कॅबिनेट व ८ राज्यमंत्र्यांनीही शपथ घेतली. भाजपच्या निर्मलसिंह यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि 'पीडीपी'ची राज्यात युती आहे.
- भाजप पक्षाला या मंत्रिमंडळात पूर्वीच्या सहाऐवजी आठ कॅबिनेट आणि तीन राज्यमंत्रिपदे मिळाली आहेत.
- मेहबुबा मुफ्ती या जम्मू-काश्मीरच्या पहिल्या तर, देशातील दुसऱ्या मुस्लिम मुख्यमंत्री ठरल्या आहेत.

- याआधी सईदा अन्वरा तैमूर यांनी ६ डिसेंबर १९८० ते ३० जून १९८१ या काळात आसामचे मुख्यमंत्रिपद भूषवले होते.
- मेहबूबा यांचे वडील आणि मुख्यमंत्री मुफ्ती मोहम्मद सईद यांच्या निधनानंतर राज्यात ९ जानेवारीपासून राज्यपाल राजवट लागू करण्यात आली होती.
- जम्मू आणि काश्मीरचे राज्यपाल : एन. एन. व्होरा

---

## मायामी टेनिस स्पर्धा

- अव्वल टेनिसपटू नोव्हाक जोकोविचने मायामी टेनिस स्पर्धा जिंकत, कारकीर्दीतील २८वे मास्टर्स जेतेपद मिळविले. जोकोविचचे हे या स्पर्धेतील सहावे जेतेपद ठरले.
- मायामी स्पर्धा जिंकून जोकोविचने कारकीर्दीत सर्वाधिक बक्षीस रक्कम मिळवणाऱ्या रॉजरर फेडररला मागे टाकले आहे.
- जोकोविचने कारकीर्दीत आतापर्यंत पटकावलेली बक्षीस रक्कम ६४८.७५ कोटी रुपये आहे. तर स्वित्झर्लंडच्या फेडररने ६४६.७० कोटी बक्षीस रकमेची कमाई केली आहे.
- दणदणीत फिटनेस आणि त्यामुळे विजयी कामगिरीतील राखलेले सातत्य यामुळे गेले ९२ आठवडे जोकोविचने जागतिक टेनिस रँकिंगमधील अव्वल क्रमांक कायम राखला आहे हे विशेष.
- मायामी जेतेपद हे जोकोविचच्या कारकीर्दीतील ६३वे एटीपी जेतेपद ठरले आहे. रॉजर फेडररच्या नावावर ८८ जेतेपदे असून रफाएल नदालने ६७ जेतेपदे पटकावली आहेत.

## अझारेन्का अजिंक्य

- ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेचे दोन वेळा जेतेपद पटकावणाऱ्या बेलारुसच्या व्हिक्टोरिया अझारेन्काने तिसऱ्यांदा डब्लूटीए मियामी खुल्या टेनिस स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरले.
- अंतिम फेरीत तिने दोन ग्रॅण्ड स्लॅम नावावर असलेल्या स्वेतलाना कुझनेत्सोव्हावर ६-३, ६-२ असा सहज विजय मिळवला.
- यापूर्वी अझारेन्काने २००९ आणि २०११मध्ये या स्पर्धेचे जेतेपद प्राप्त केले होते. तसेच या वर्षांतील तिचे हे ब्रिस्बेन आणि इंडियन वेल्सनंतरचे तिसरे अजिंक्यपद आहे.
- अझारेन्काने एकाच हंगामात मियामी आणि इंडियन वेल्स स्पर्धेत बाजी मारणाऱ्या तिसऱ्या खेळाडूचा मान पटकावला. यापूर्वी स्टेफी ग्राफने १९९४ व १९९६मध्ये, तर किम क्लिजस्टेर्सने २००५मध्ये ही किमया केली होती.

# ६ एप्रिल

## स्टँडअप इंडिया योजनेला सुरुवात

- देशातील अनुसूचित जाती-जमातींतील तसेच महिला उद्योजक यांना पतपुरवठा करण्यासाठी केंद्र सरकारने घोषित केलेल्या स्टँडअप इंडिया योजनेचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५ एप्रिल रोजी नोएडा येथे केले.
- स्टँडअप योजनेअंतर्गत १० लाख रुपयांपासून एक कोटी रुपयांपर्यंत कर्ज अनुसूचित जाती-जमाती व महिला या गटांतील उद्योजकांना दिले जाणार आहे. हे कर्ज नवा उद्योग स्थापण्यासाठी दिले जाईल.
- हे कर्ज मिळालेल्या अनुसूचित जाती-जमाती व महिला उद्योजकांना कर्जाची रक्कम काढण्यासाठी रुपे डेबिट कार्ड दिले जाणार आहे.
- याशिवाय उद्योजकता योग्य प्रकारे अंगी बाणवता यावी यासाठी उद्योगपूर्व प्रशिक्षण, कर्ज घेण्यासाठी मार्गदर्शन, विपणनाची मदत इत्यादी सहकार्य दिले जाणार आहे.
- स्टँडअप इंडियाच्या माध्यमातून कर्ज पुरवठा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी आवश्यक आहे. त्यासाठी भारतीय लघुउद्योग विकास बँकेने (सिडबी) १० हजार कोटी रुपये, राष्ट्रीय क्रेडिट गॅरंटी ट्रस्टी कंपनीने पाच हजार कोटी रुपये वित्तपुरवठा केला आहे.
- अनावरणप्रसंगी प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत भारतीय मायक्रो क्रेडिटतर्फे ५ हजार १०० ई-रिक्षांचे वाटपही करण्यात आले.

## अमेरिका पाकिस्तानला हेलिकॉप्टर्स विकणार

- अमेरिका पाकिस्तानला एएच-१ झेड व्हायपर प्रकारची नऊ हेलिकॉप्टर्स विकणार आहे, त्यांची किंमत १७ कोटी डॉलर्स आहे.
- बेल एच १ झेड व्हायपर हेलिकॉप्टर्स दोन इंजिनांची असून ती एएच १ डब्ल्यू सुपरकोब्रा या हेलिकॉप्टर्सची आवृत्ती आहे.
- ओबामा प्रशासनाने अलीकडे पाकिस्तानला आठ एफ १६ विमाने विकण्याचा निर्णय घेतला होता, त्यानंतर आता हेलिकॉप्टर्सही दिली जाणार आहेत.
- ६ एप्रिल २०१५ला परराष्ट्र खात्याने काढलेल्या अधिसूचनेत असे म्हटले होते, की अमेरिका पाकिस्तानला ९५ कोटी डॉलर्सची लष्करी सामग्री देणार आहे.
- पाकिस्तानला दिल्या जाणाऱ्या लष्करी सामुग्रीच्या मदतीअंतर्गत सप्टेंबर २०१८ अखेरीस ही हेलिकॉप्टर्स दिली जाणार आहेत.
- पाकिस्तानने एएत-१ झेड व्हायपर प्रकारची १५ हेलिकॉप्टर्स व एडीएम ११४ आर हेलफायर २ प्रकारची १००० क्षेपणास्त्रे, तर टी ७०० जीई ४०१ सी प्रकारची ३२ इंजिने मागितली होती.
- भारताने तसेच अमेरिकी काँग्रेसच्या सदस्यांनी त्या वेळी पाकिस्तानला एफ १६ जेट विमाने देण्यास विरोध केला होता. आता व्हायपर हेलिकॉप्टर्स देण्याच्या निर्णयाने प्रादेशिक सुरक्षा समतोल बिघडण्याची शक्यता आहे.

## आयसीसी संघाचे कर्णधारपद विराट कोहलीकडे

- ट्वेंटी-२० विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) सर्वोत्तम संघाची घोषणा केली असून, या संघाचे कर्णधारपद विराट कोहलीकडे देण्यात आले आहे.
- या संघात भारताचा जलदगती गोलंदाज आशिष नेहराचाही समावेश असून, कोहली आणि नेहरा यांच्याव्यतिरिक्त एकही भारतीय खेळाडूचा समावेश नाही.
- भारतात झालेल्या ट्वेंटी-२० विश्वकरंडक स्पर्धेत वेस्टइंडीज संघाने इंग्लंडचा पराभव करून विजेतेपद मिळविले. या स्पर्धेनंतर आयसीसीने सर्वोत्तम ट्वेंटी-२० संघाची घोषणा केली.
- या संघात दोन भारतीयांसह इंलंडच्या चार, वेस्टइंडीजच्या दोन, तर ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, बांगलादेशमधील एका खेळाडूचा समावेश आहे. या संघात पाकिस्तानच्या एकही खेळाडूचा समावेश नाही.

---

## वकार युनूस यांचा प्रशिक्षकपदाचा राजीनामा

- पाकिस्तान क्रिकेट मंडळाकडून योग्य चालना मिळत नसल्यामुळे संघ सकारात्मक पद्धतीने वाटचाल करू शकत नाही, अशी कारणमीमांसा करीत वकार युनूस यांनी पाकिस्तानच्या मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला आहे.
- नुकत्याच भारतात झालेल्या ट्वेन्टी-२० विश्वचषकात पाकिस्तानचे आव्हान साखळीतच संपुष्टात आले. या पार्श्वभूमीवर शाहिद आफ्रिदीने पाकिस्तानच्या ट्वेन्टी-२० संघाचे कर्णधारपद सोडले होते.

- ट्वेन्टी-२० विश्वचषकात पाकिस्तानच्या संघाला फक्त बांगलादेशविरुद्ध विजय मिळवता आला. मात्र भारत, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्याकडून त्यांनी हार पत्करली.
- युनूस यांनी २०१४मध्ये दुसऱ्यांदा प्रशिक्षकपदाची सूत्रे स्वीकारली होती. त्याआधी २०१०-११मध्ये त्यांनी प्रशिक्षकपद सांभाळले होते. पण खासगी कारणास्तव सप्टेंबर २०११मध्ये त्यांनी राजीनामा दिला होता.
- ट्वेन्टी-२० विश्वचषकातील सुमार कामगिरी प्रकरणी पाकिस्तान क्रिकेट मंडळाने राष्ट्रीय निवड समिती बरखास्त केली आहे.

# ७ एप्रिल

## ‘एमपीएससी’साठीच्या वयोमर्यादेमध्ये वाढ

- राज्य सरकारने एमपीएससीसाठी तयारी करणाऱ्या व खुल्या प्रवर्गातून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वयोमर्यादा वाढविली आली आहे.
- राजपत्रित अधिकाऱ्यांची वयोमर्यादा ३३ वरुन ३८ वर्ष करण्यात आली आहे. तर पीएसआयची वयोमर्यादा २८ वरुन ३३ वर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पोलिस शिपाई पदाची वयोमर्यादा २५ वरुन २८ वर्ष करण्यात आली आहे.

---

## एसबीआयमध्ये १७,१४० पदांची भरती

- भारतीय स्टेट बँकेत कनिष्ठ सहकारी, कनिष्ठ कृषी सहकारी, कनिष्ठ सहकारी (बॅकलॉग) आणि कनिष्ठ सहकारी (विशेष भरती) अशा जागांसाठी १७,१४० पदांची भरती करण्यात येणार आहे.
- यामध्ये कनिष्ठ सहकारी स्तरावरील १०,७२६ पदे, कनिष्ठ कृषी सहकारी स्तरावरील ३००८ पदे, कनिष्ठ सहकारी (बॅकलॉग) स्तरावरील ३,२१८ पदे तर कनिष्ठ सहकारी (विशेष भरती) स्तरावरील १८८ पदे भरण्यात येणार आहेत.
- भरतीसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्यांसाठी अर्जाची ऑनलाइन नोंदणी ५ एप्रिलपासून सुरू झाली असून ऑनलाइन अर्जाची शेवटची तारीख २५ एप्रिल ही आहे. ऑनलाइन फी भरण्याची तारीख ५ एप्रिल ते २५ एप्रिल आहे.

- या भरतीसाठी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विषयातील पदवी ही शैक्षणिक अर्हता आहे. लेखी परीक्षा व मुलाखत या माध्यमातून निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

---

## राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प

- राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पाच्या अंमलबजावणीला केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली. ३६७९.७६ कोटी रुपयांची ही केंद्रीय योजना आहे.
- यामध्ये ३६४० कोटी रुपये राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पासाठी तर ३९.७६ कोटी रुपये राष्ट्रीय जलसूचना केंद्रासाठी ठेवण्यात आले आहेत.
- प्रकल्पाच्या ५० टक्के रक्कम जागतिक बँकेकडून कर्ज रुपात मिळणार आहे. केंद्र सरकार हे कर्ज फेडणार आहे. उर्वरित ५० टक्के रक्कम केंद्रीय सहाय्यतेच्या रुपात मिळेल.
- दोन टप्प्यात हा प्रकल्प लागू केला जाईल. जलसंसाधन, नदीविकास आणि गंगा पुनरुज्जीवन मंत्रालयाच्या अखत्यारीत स्वतंत्र संस्था म्हणून राष्ट्रीय जल माहिती केंद्राच्या निर्मितीची यात तरतूद आहे.
- राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पामुळे जल-हवामान-विषयक माहिती एकत्रित करण्यासाठी मदत होईल. वास्तव काळाच्या आधारावर त्याचे विश्लेषणही केले जाईल. राज्य, जिल्हा, गाव पातळीवरही ही माहिती पाहता येईल.
- आधीचा जलविज्ञान प्रकल्प १३ राज्यांपुरताच मर्यादित होता मात्र आता या प्रकल्पाची व्याप्ती देशभर आहे.

**या प्रस्तावातले घटक :**

१. राष्ट्रीय जलसूचना केंद्राची स्थापना

२. जलसंसाधन संचालन आणि व्यवस्थापन प्रणाली

३. जलसंसाधन संस्था आणि क्षमता वृध्दी.

---

## आशियातील प्रभावी महिला उद्योजकांची यादी

- रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्षा नीता अंबानी यांना फोर्ब्सच्या यादीत 'आशियातील सर्वात प्रभावी महिला उद्योजका'चा मान मिळाला असून त्यांना भारतीय उद्योगाच्या 'फर्स्ट लेडी' असेही संबोधण्यात आले आहे.
- फोर्ब्स मासिकाने आशियातील आघाडीच्या ५० प्रभावी महिला उद्योजकांची यादी सादर केली आहे. या मासिकाच्या मुखपृष्ठावर नीता अंबानी यांचे छायाचित्र आहे.
- आठ भारतीय महिलांनी फोर्ब्जच्या या यादीत (आशिया फिफ्टी पॉवर बिझनेस वुमेन २०१६) स्थान मिळविले आहे. भारतीय स्टेट बँकेच्या अध्यक्षा अरुंधती भट्टाचार्य यांना या यादीत दुसऱ्या क्रमांकावर स्थान मिळाले आहे.

| या यादीतील भारतीय महिला | | |
|---|---|---|
| क्रमांक | नाव | संबधित उद्योग |
| १ | नीता अंबानी | रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्षा |
| २ | अरुंधती भट्टाचार्य | भारतीय स्टेट बँकेच्या अध्यक्षा |
| १४ | अंबिगा धीरज | एमयु सिग्मा |
| १६ | दिपाली गोयंका | वेलप्सन इंडियाच्या सीईओ |
| १८ | विनिता गुप्ता | ल्युपिनच्या सीईओ |

| | | |
|---|---|---|
| २२ | चंदा कोचर | आयसीआयसीआय बँकेच्या एमडी आणि सीईओ |
| २६ | वंदना लुथरा | व्हीएलसीसी हेल्थकेअरच्या संस्थापक |
| २८ | किरण मजुमदार शॉ | बायोकॉनच्या संस्थापक व अध्यक्ष |

## अमेरिकेत व्हिसा घोटाळा

- कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या अमेरिकेच्या विविध यंत्रणांनी एकत्र कारवाई करत 'पे टू स्टे' हा व्हिसा घोटाळा उघडकीस आणला.
- या प्रकरणी भारतीय वंशाच्या १० अमेरिकन नागरिकांसह एकूण २१ जणांना अटक करण्यात आली आहे.
- परदेशी नागरिकांना अवैध पद्धतीने विद्यार्थी व कामगार व्हिसा मिळवून देणे व त्याची मुदतवाढ करणे असे त्यांच्यावर आरोप आहेत.
- या घोटाळ्यात तब्बल एक हजार परदेशी नागरिक गुंतले असून, त्यात प्रामुख्याने भारत व चीनमधील नागरिकांचा समावेश आहे.

## केंद्र सरकारतर्फे पंख्यांची विक्री

- वीजवापरात बचत करणाऱ्या एलईडी दिव्यांच्या यशस्वी वितरणानंतर केंद्र सरकारतर्फे आता खास उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पंख्यांची विक्री करण्यात येणार आहे.

- केंद्राच्या अखत्यारित येणाऱ्या 'एनर्जी एफिशियंसी सर्व्हिसेस लिमिटेडतर्फे' (ईईएसएल) ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेची सुरुवात ७ एप्रिलपासून आंध्र प्रदेशात होणार आहे.
- या योजनेअंतर्गत पन्नास वॉट क्षमतेचा पंखा (सिलिंग फॅन) ५५ रुपयांच्या दरमहा ईएमआयच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला जाणार आहे.
- चोवीस महिन्यांच्या ईएमआयच्या या योजनेमध्ये लाइट बिलामधून पंख्याचे पैसे वसूल करण्यात येणार आहेत.
- ईएमआयच्या माध्यमातून खरेदी केल्यास एक पंखा अंदाजे १,३२० रुपयांना मिळेल. मात्र, एकरकमी पैसे दिल्यास हाच पंखा १,१०० ते १,१५० रुपयांदरम्यान उपलब्ध होईल.
- वर्षभरात साधारणतः १५ ते २० लाख पंख्यांची विक्री करण्याचा सरकारचा मानस आहे. एका पंख्यांच्या माध्यमातून वर्षभरात ९० युनिटची बचत होण्याची शक्यता आहे.
- महाराष्ट्रात या योजनेची सुरुवात साधारणतः जुलै-ऑगस्टपासून होण्याची शक्यता आहे. चालू वर्षात ही योजना दिल्ली, राजस्थान व उत्तर प्रदेशसमवेत पाच राज्यांमध्ये राबविण्यात येणार आहे.

# ८ एप्रिल

## राष्ट्रीय ऊर्जाक्षम कृषी वीजपंप कार्यक्रम

- केंद्रीय ऊर्जामंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथे 'राष्ट्रीय ऊर्जाक्षम कृषी वीजपंप कार्यक्रम' (एनईईएपीपी) योजनेचे उद्घाटन झाले.
- मोदी सरकारच्या या योजनेच्या पहिल्या टप्प्यात देशातील दहा लाख जुने, तसेच जास्त वीज खेचणारे कृषिपंप विनामूल्य बदलून शेतकऱ्यांना आधुनिक, स्मार्ट कृषिपंप केंद्र सरकार देणार आहे.
- आगामी वर्षभरात पूर्ण होणाऱ्या या महत्त्वाकांक्षी योजनेत महाराष्ट्राला सर्वाधिक; म्हणजे पाच लाख स्मार्ट कृषिपंप मिळणार आहेत.
- या योजनेत शेतकऱ्यांकडील प्रचलित वीजपंप सरकारच बदलून देणार आहे. त्याऐवजी पंचतारांकित नवे पंप बसवून दिले जातील.
- या संपूर्ण योजनेचे मुख्य संचालन दिल्लीतून होईल व राज्याने अंमलबजावणी करताना संपूर्ण पारदर्शकता बाळगावी अशी प्रणाली यात असेल.
- कृषिपंपांसाठी सध्या वर्षाला किमान ६५ हजार कोटी रुपये अंशदान सरकार देते. नव्या पंपांमुळे यात ३० टक्के म्हणजे साधारणतः १८ ते २० हजार कोटी रुपये बचत होणार आहे.

### 'स्मार्ट पंप' म्हणजे काय?

- पंपातील आधुनिक यंत्रणेमुळे संबंधित शेतकऱ्यांच्या वीजबिलात किमान ३० टक्के कपात होईल.

- या पंपांना स्मार्ट मीटर बसविलेला असेल. ते पंप शेतकरी रिमोट कंट्रोलद्वारे; म्हणजे प्रसंगी हातातल्या मोबाईलद्वारेही नियंत्रित करू शकतील.

## सुधा मूर्ती यांना रयत माऊली पुरस्कार

- रयत शिक्षण संस्थेच्या वतीने दिला जाणारा या वर्षीचा ‘रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील’ पुरस्कार शिक्षण आणि विविध क्षेत्रांत मोठे योगदान देणाऱ्या सुधा मूर्ती यांना जाहीर झाला आहे.
- अडीच लाख रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.
- दरवर्षी गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला लक्ष्मीबाई पाटील यांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण केले जाते. मात्र, सुधा मूर्ती सध्या अमेरिकेत आहेत. त्यांच्या सोयीनुसार हा पुरस्कार त्यांना प्रदान केला जाणार आहे.

## फ्रान्समध्ये सेक्स ट्रॅफिकिंग विरोधी विधेयक मंजूर

- वेश्याव्यवसाय आणि लैंगिक कारणासाठी केल्या जाणाऱ्या मानवी तस्करीविरोधात (सेक्स ट्रॅफिकिंग) कारवाईची तरतूद करणारे संवेदनशील विधेयक फ्रान्समधील लोकप्रतिनिधींनी ७ एप्रिल रोजी संमत केले.
- या नव्या विधेयकानुसार वेश्याव्यवसायाचा फायदा घेणाऱ्या ग्राहकांना जबर दंडाबरोबरच लैंगिक व्यापारामधील धोके विशद करणाऱ्या शिकवणी वर्गास उपस्थित राहणेही बंधनकारक करण्यात आले आहे.

- सेक्स वर्करला पैसे देणाऱ्या ग्राहकाला गुन्हेगार घोषित करणारा फ्रान्स हा युरोपातील पाचवा देश ठरला आहे. या पूर्वी स्वीडन, नॉर्वे, आइसलँड आणि इंग्लंड या देशांनीही असा कायदा मंजूर केला आहे.
- दलाली करणे हा गुन्हा असल्याचा कायदा तर या देशांमध्ये अगोदरपासूनच लागू करण्यात आला आहे.
- फ्रान्समध्ये याआधी (२००३) करण्यात आलेल्या कायद्यान्वये भर रस्त्यात ग्राहकांना वश करण्याचा प्रयत्न करण्यावर बंदी घालण्यात आली होती.
- या नव्या कायद्यान्वये ग्राहकास १,५०० युरोंचा (१७०० डॉलर्स) दंड ठोठावण्यात येणार असून; पुन्हा अशा प्रकाराचा गुन्हा करताना आढळल्यास दंडाची रक्कम ३,७५० युरोंपर्यंत वाढविण्यात येणार आहे.
- नव्या कायद्यात सेक्स वर्करना नवे काम देणे आणि परदेशी सेक्स वर्करना तात्पुरत्या निवासाचा परवाना देण्याबाबतही तरतूद करण्यात आली आहे.
- तथापि, फान्सच्या सुमारे ३० हजार सेक्स वर्करना हा कायदा मान्य नाही. या कायद्याला विरोध करण्यासाठी फ्रान्सच्या संसदेसमोर सुमारे ६० आंदोलकांनी आपला विरोध दर्शवला.

---

## मनमोहन सिंग पंजाब विद्यापीठाचे मानद प्राध्यापक

- रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, अर्थमंत्री आणि दहा वर्षे देशाचे पंतप्रधानपद सांभाळल्यानंतर माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग मानद व्याख्याते म्हणून पंजाब विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

- प्रख्यात अर्थतज्ज्ञ असलेल्या मनमोहन सिंग यांनी १९५४मध्ये पंजाब विद्यापीठातून अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी घेतली होती. त्यानंतर १९५७ मध्ये ते याच विद्यापीठात व्याख्याते म्हणून रुजू झाले होते.
- संयुक्त राष्ट्रसंघाच्या न्यूयॉर्क येथील सचिवालयात आर्थिक व्यवहार अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यानंतर १९६६ साली त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला होता. आता तब्बल २५ वर्षांनंतर मनमोहन सिंग पुन्हा त्याच भूमिकेत जाणार आहेत.
- पंजाब विद्यापीठातील जवाहरलाल नेहरू अध्यासनात प्राध्यापक म्हणून शिकवण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली आहे.

---

## जमात-उद-दवाचे 'शरिया न्यायालय'

- मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार असलेल्या हफीझ सईदच्या जमात-उद-दवा (जेयूडी) या संघटनेने तालिबानच्या धर्तीवर लोकांना 'सोपा व जलद' न्याय देण्यासाठी 'शरिया न्यायालय' स्थापन केले आहे.
- जेयूडीने स्थापन केलेल्या 'शरिया न्यायालयाचे' मुख्यालय जामिया कादसिया चौबुर्जी येथे असून त्यात एक काझी (न्यायाधीश) खादमिन (न्यायालय सहायक)च्या मदतीने तक्रारींवर निर्णय घेतो.
- 'दारूल काझा शरिया' नावाने ओळखली जाणारी समांतर खासगी न्यायव्यवस्था जेयूडीने लोकांना 'सहज व जलद' न्याय पुरवण्यासाठी स्थापन केली असून ती प्रामुख्याने मालमत्तेशी संबंधित व आर्थिक वादांची प्रकरणे हाताळते.

- या तक्रारी सईदच्या नावाने केल्या जातात व तो नंतर पुढील कार्यवाहीसाठी त्या काझीकडे पाठवतो.
- पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात स्थापन झालेली ही अशा प्रकारची पहिलीच समांतर न्यायव्यवस्था आहे.

---

## भारत-स्वीडन सामंजस्य कराराला मंजूरी

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत १५ फेब्रुवारी २०१६ रोजी झालेल्या भारत-स्वीडन रेल्वे क्षेत्रातील तांत्रिक सहकार्य परस्पर सामंजस्य कराराला मंजूरी देण्यात आली.
- या परस्पर सामंजस्य करारामुळे खालील क्षेत्रात तांत्रिक सहकार्य प्रदान केले जाणार आहे.

१. रेल्वे धोरण विकास नियमन, संस्था दोन्ही देशांमधील वैशिष्टये

२. ज्ञानाची देवाण-घेवाण, तांत्रिक कौशल्य, नवीन उपक्रम, तंत्रज्ञान, शाश्वत उपाययोजना आणि संशोधन

३. शीत प्रदेशात मालवाहतूक, क्षमता निर्धारण (निश्चित वेळापत्रक) आणि कमाल देखभाल, सुधारित माल/संयुक्त वाहतूक

४. रेल्वे अभियंते आणि व्यवस्थापकांसाठी नियमित प्रशिक्षण आणि रेल्वेची विश्वसनियता व देखभाल यावर शिक्षण

---

# १ एप्रिल

## सचिन तेंडुलकर स्कील इंडिया योजनेचा ब्रँड अँम्बेसेडर

- मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरला केंद्र सरकारने 'स्कील इंडिया' (कौशल्य विकास) योजनेचा ब्रँड अँम्बेसेडर बनवले आहे.
- जास्तीत जास्त युवकांपर्यंत पोहोचता यावे तसे कौशल्य विकासाप्रती तरूणांमध्ये जागरुकता निर्माण करता यावी यासाठीच सरकारने सचिनला आपल्या 'I Support Skill India' या कॅम्पेनचा 'चेहरा बनवण्याचा निर्णय घेतला आहे.
- देशात कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे, तरुणांना आपल्या पायावर उभे राहता यावे व रोजगारनिर्मितीचे प्रमाण वाढावे यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय कौशल्य विकास योजना सुरू केली आहे.
- या योजनेंतर्गत २०२२पर्यंत देशातील ४० कोटींहून अधिक तरूणांना कुशल बनवण्याचे लक्ष्य मंत्रालयासमोर आहे.
- हे कॅम्पेन समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच कुशल भारत बनवण्याच्या लक्ष्यातील एक महत्वपूर्ण पाऊल आहे.

---

## मीरा बोरवणकर पोलीस संशोधन आणि विकास महासंचालकपदी

- महाराष्ट्र कॅडरच्या आयपीएस अधिकारी मीरा सी. बोरवणकर यांची पोलीस संशोधन आणि विकास (बीपीआर अँन्ड डी) महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

- त्या १९८१च्या तुकडीतील अधिकारी आहेत. मुंबई गुन्हेशाखेच्या पहिल्या महिला आयुक्त होण्याचा मानही त्यांनी पटकावला होता.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अखत्यारितील कार्मिक विभागाने बोरवणकर यांच्या नियुक्तीचा आदेश जारी केला. पदभार स्वीकारतील त्या दिवसांपासून ३० सप्टेंबर २०१७ रोजी निवृत्त होईपर्यंत त्या पदभार सांभाळतील.

---

## आसाम रायफल्समध्ये महिलांना संधी

- देशातील सर्वांत जुने निमलष्करी दल असलेले आसाम रायफल्सने प्रथमच नव्याने सेवेत रूजू झालेल्या २१२ जवानांमध्ये १०० महिलांना संधी दिली आहे.
- नागालँडमधील शोखुवी येथील आसाम रायफल्स प्रशिक्षण केंद्रामध्ये वर्षभर प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांना सेवेमध्ये रुजू करून घेण्यात आले.
- आसाम रायफल्स हे केंद्रीय गृह आणि संरक्षण मंत्रालयाच्या संयुक्त अखत्यारीत येते. गेल्या वर्षी मार्च महिन्यात दिमापूर येथील प्रशिक्षण कार्यक्रमासाठी रायफल्सने १२७ महिलांची निवड केली होती.
- त्यासाठी देशभरातून निवडचाचणी घेण्यात आली होती. यापैकी २७ महिला वैद्यकीय चाचणी; तसेच प्राथमिक चाचण्यांमध्ये अनुत्तीर्ण झाल्याने १०० महिलांना पुढील प्रशिक्षणासाठी निवडण्यात आले.
- या महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी लष्करातील तीन महिला अधिकाऱ्यांची मार्च २०१४ पासून प्रशिक्षण संस्थेमध्ये नियुक्ती करण्यात आली होती.

- नव्याने सेवेत रूजू झालेल्या महिला जवानांचा विविध बटालियनमध्ये समावेश करण्यात येईल. महिलांची चौकशी, गर्दीवर नियंत्रण मिळवणे, जमावाला पांगवणे, आंदोलने हाताळणे यांसारखी कामे त्यांना देण्यात येतील.

---

## 'फिनमेकानिका ग्रुप'च्या माजी प्रमुखांना तुरुंगवास

- इटलीमधील संरक्षण आणि हवाई क्षेत्रामध्ये कार्यरत असलेला सर्वांत मोठ्या 'फिनमेकानिका ग्रुप'चे माजी प्रमुख जुसेप्पे ओरसी यांना साडेचार वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.
- तसेच, 'ऑगस्टा वेस्टलँड'चे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) ब्रुनो स्पॅग्नोलिनी यांनाही कोर्टाने चार वर्षांचा तुरुंगवास ठोठावला आहे. इटलीच्या कंपनीला त्यामुळे मोठा धक्का बसला आहे.
- भारताला विक्री करण्यात आलेल्या ३,६०० कोटी रुपयांच्या १२ व्हीव्हीआयपी हेलिकॉप्टरमध्ये चुकीचा हिशेब आणि भ्रष्टाचारप्रकरणी ही शिक्षा सुनावण्यात आली आहे.
- कोर्टाने यापूर्वी या दोघांना भ्रष्टाचाराच्या आरोपांमध्ये निर्दोष ठरवले होते. सरकारी वकिलांनी या दोघांना सहा आणि पाच वर्षांच्या तुरुंगवासाची मागणी केली होती.
- व्हीव्हीआयपी हेलिकॉप्टरमधील भ्रष्टाचाराचे प्रकरण समोर आल्यानंतर भारताने १ जानेवारी २०१४ रोजी 'ऑगस्टा वेस्टलँड'बरोबरील कंत्राट रद्द केले.

- हवाई दलाचे माजी प्रमुख एस. पी. त्यागी आणि त्यांचे चुलतभाऊ यामध्ये लाभार्थी असल्याच्या आरोपावरून सीबीआय आणि अंमलबजावणी संचालनालय (ईडी) यांच्याकडून त्यांची चौकशी सुरू आहे.

---

# १० एप्रिल

## आंतरखंडीय क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतल्याचा उत्तर कोरियाचा दावा

- अमेरिकेवरही अण्वस्त्र हल्ला करण्याची क्षमता असलेल्या आंतरखंडीय क्षेपणास्त्र रॉकेट इंजिनची यशस्वी चाचणी घेतल्याचे उत्तर कोरियाने १० एप्रिल रोजी जाहीर केले.
- उत्तर कोरियाने गेल्या काही महिन्यांपासून वारंवार क्षेपणास्त्र चाचण्या घेत अमेरिका आणि दक्षिण कोरियावर हल्ला करण्याची धमकी दिली आहे.
- कोरियाने आपली मारक क्षमता वाढविली असली, तरी अमेरिकेवर क्षेपणास्त्र हल्ला करण्यासाठी या देशाला आणखीही बरीच तयारी करावी लागणार आहे.
- या देशाकडे अचूक मारा करू शकतील, असे आंतरखंडीय क्षेपणास्त्र नाही. तिथेच अमेरिकेकडे मात्र उत्तर कोरियाच्या कोणत्याही भागात अचूक मारा करून, प्रचंड मनुष्यहानी करू शकतील, अशी असंख्य क्षेपणास्त्रे आहेत.
- उत्तर कोरियाने अंतरमहाद्वीपीय बैलिस्टिक रॉकेट इंजिनच्या यशस्वी चाचणीची घोषणा केली असली तरी दक्षिण कोरियाच्या सूत्रांच्या मतानुसार उत्तर कोरियाकडे असे कोणतेही विश्वसनीय इंजिन नाही.
- संयुक्त राष्ट्राची बंदी
- संयुक्त राष्ट्राने यापूर्वीच उत्तर कोरियावर अनेक बंधने लादली आहेत. पण उत्तर कोरिया कोणत्याच बंधनाला जुमानत नाही.

- संयुक्त राष्ट्राने नुकतेच उत्तर कोरियावर कोणतीही आंतरखंडीय कृती करण्यावर बंदी घातली होती. पण उत्तर कोरियाने या बंधनांना झुगारून मध्यम पल्ल्याच्या आंतरखंडीय क्षेपणास्त्राचे प्रक्षेपण केले होते.
- २०१४ नंतर उत्तर कोरियाचे हे पहिलेच मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्राचे प्रक्षेपण होते.

---

## प्रियदर्शनी चॅटर्जी 'मिस इंडिया वर्ल्ड २०१६'

- फॅशन जगताचे लक्ष लागलेल्या सौंदर्य स्पर्धेत दिल्लीच्या प्रियदर्शनी चॅटर्जी हिने बाजी मारत 'मिस इंडिया वर्ल्ड २०१६'चा किताब पटकाविला.
- बॉलिवूडमधील सुपरस्टार शाहरुख खानने प्रियदर्शनीच्या नावाची घोषणा केली. आता प्रियदर्शनी आता 'मिस वर्ल्ड २०१६' सौंदर्यस्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.
- बंगळूरची सुश्रुती कृष्णा हिला प्रियदर्शनीच्या पाठोपाठ प्रथम उपविजेतीचा मान मिळाला, तर लखनौची पंखुरी गिडवानी ही द्वितीय उपविजेती ठरली.
- यामुळे सुश्रुता कृष्णा ही 'मिस इंटरनॅशनल २०१६' स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे. तसेच, पंखुरा गिडवानी ही 'मिस ग्रँड इंटरनॅशनल २०१६' स्पर्धेत सहभागी होईल.

---

## 'ब्रिक्स'ची मुंबईत तीनदिवसीय परिषद

- ब्राझिल, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या पाच देशांची संघटना असलेल्या 'ब्रिक्स'ची तीन दिवसांची परिषद १४ ते १६ एप्रिल दरम्यान मुंबईत पार पडली.
- ब्रिक्स देशांचे अध्यक्षपद भारताकडे आल्यानंतर भारतात होत असलेली ही पहिलीच परिषद असेल. शहर विकास ही या परिषदेची मूळ संकल्पना आहे.
- नागरी वाहतूक, पायाभूत सुविधांसाठीचे वित्तीय व्यवस्थापन, शाश्वत शहरे, परिणामकारक जनसुविधा पुरविणे, परवडणारी घरे, जमिनींचा परिणामकारक वापर या विषयांवर परिषदेत व्यापक चर्चा झाली.
- १४ तारखेला राज्यपाल सी.विद्यासागर राव यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. मेक इन इंडियाच्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणूनही या परिषदेला महत्त्व आहे.

# ११ व १२ एप्रिल

## भारत आणि मालदीव यांच्यामध्ये सहा करार

- मालदीवचे अध्यक्ष अब्दुल्ला यामीन अब्दुल गयूम यांच्या दोन दिवसांच्या भारत दौऱ्यात भारत आणि मालदीव यांच्यामध्ये विविध सहा करार करण्यात आले.
- संरक्षण सहकार्यासह करांची पुनरुक्ती टाळणे, करांबाबत माहिती देणे, अवकाश सहकार्य, ऐतिहासिक वास्तूंचे जतन आणि पर्यटन अशा क्षेत्रांमध्ये हे करार करण्यात आले.
- पंतप्रधान मोदी आणि गयूम यांच्यात विविध विषयांवर द्विपक्षीय चर्चा झाली. मालदीवच्या परराष्ट्र धोरणात भारताला प्रथम प्राधान्य असल्याचे गयूम यांनी मोदींना सांगितले.

### करारांमधील ठळक मुद्दे

- संरक्षण मंत्रालयाच्या पातळीवरून सहकार्य वाढविणार
- भारतातर्फे मालदीवमध्ये पोलिस अकादमी आणि संरक्षण मंत्रालयासाठी इमारत बांधली जाणार
- आरोग्य आणि पर्यटन सेवा वाढविण्यासाठी प्रयत्न
- आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे एकाच वस्तूवर दोन वेळा बसणारा कर टाळणार
- मालदीवमधील प्राचीन मशिदी आणि इतर ऐतिहासिक वास्तूंचे भारतीय पुरातत्त्व खात्यातर्फे जतन
- दक्षिण आशियाई उपग्रहासाठी एकमेकांना सहकार्य

## जगातील वाघांच्या संख्येत वाढ

- वन्यजीन संवर्धन गटाच्या जगभरात करण्यात आलेल्या व्याघ्रगणनेत शतकामध्ये पहिल्यांदाच वाघांची संख्या वाढली आहे.
- रशियापासून ते व्हिएतनामच्या जंगलामध्ये ही व्याघ्रगणना करण्यात आली असून वाघांची संख्या ३८९० वर पोहोचली आहे. २०१०मध्ये करण्यात आलेल्या व्याघ्रगणनेत वाघांची संख्या ३२०० होती.
- संवर्धन गट आणि प्रत्येक देशाच्या सरकारने व्याघ्रगणनेत सहभाग घेतला होता आणि त्याच आधारे ही आकडेवारी समोर आली आहे.
- महत्वाची गोष्ट म्हणजे वाघांची संख्या वाढण्यामध्ये भारताचं खूप मोठे योगदान असून अर्ध्यापेक्षा जास्त वाघ भारतामध्येच आहे. भारतामधील जंगलांमध्ये एकूण २२२६ वाघ आहेत.
- २०१०मध्ये वाघांची संख्या कमी झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर सर्व देशांनी संवर्धन गटाशी हातमिळवणी करुन २०२२पर्यंत वाघांची संख्या वाढवण्याची शपथ घेतली होती.
- या पाहणीमध्ये भारत, रशिया, भुतान, नेपाळमध्ये वाघांची संख्या वाढल्याचे समोर आले आहे. २०१४मध्ये करण्यात आलेल्या गणनेच्या आधारावर ही आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे.

## विश्वनाथन आनंदला हृदयनाथ जीवन गौरव पुरस्कार

- हृदयेश आर्टस या संस्थेतर्फे दिला जाणारा यंदाचा हृदयनाथ जीवन गौरव पुरस्कार आंतरराष्ट्रीय बुध्दीबळ ग्रँडमास्टर विश्वनाथन आनंदला दिला जाणार आहे.
- राज्यपाल विद्यासागर राव यांच्या हस्ते विश्वनाथन आनंदला १२ एप्रिल २०१६ रोजी सांयकाळी ७ वाजता दिनानाथ मंगेशकर नाटयगृह, विलेपार्ले (प), मुंबई येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.
- भारतरत्न लता मंगेशकर, आशा भोसले, अमिताभ बच्चन व ए आर रेहमान यांना यापूर्वी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

---

## कॅमेरॉन यांच्या प्राप्तिकराची माहिती सार्वजनिक

- ब्रिटनचे पंतप्रधान डेव्हिड कॅमेरॉन यांनी आपल्या प्राप्तिकराची माहिती सार्वजनिक केली. असे करणारे ते ब्रिटनचे पहिले पंतप्रधान ठरले आहेत.
- 'पनामा पेपर्स'च्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे पाऊल उचलले असून, या करचुकवेगिरीची चौकशी करण्यासाठी त्यांनी कृती समितीचीही स्थापना केली आहे.
- 'पनामा पेपर्स' प्रकरण उघडकीस येताच, काही विरोधकांनी कॅमेरॉन यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर कॅमेरॉन यांनी गेल्या सहा वर्षांतील प्राप्तिकराची माहिती जाहीर केली आहे.
- २०१४-१५ या काळात त्यांचे उत्पन्न दोन लाख पौंडापेक्षा अधिक होते आणि यावर त्यांनी ७६ हजार पौंड कर भरला आहे.

---

# अश्विन मन्ना फुड्सचा 'ग्लोबल ब्रँड अँबॅसेडर'

- आरोग्य क्षेत्रातील अत्पादनांमध्ये आघाडीवर असणाऱ्या मन्ना फुड्सने 'ग्लोबल ब्रँड अँबॅसेडर' म्हणून अश्विनची निवड केली आहे.
- गोलंदाजीत सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरी केल्याने आर. अश्विनने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकाविले आहे. अश्विन हा मुन्ना फूड्स ब्रँडचा पहिलाच बँड अँबॅसेडर आहे.
- मुन्ना फूड्सने पुदुचेरीसह दक्षिण भारतात सक्षमपणे आपले पाय रोवले आहेत. मागील वर्षी त्यांनी ओडिशा, पश्चिम बंगाल आणि बिहारमध्येही विस्तार केला.
- तसेच, संयुक्त अरब अमिराती, कतार, ओमान, सौदी अरेबियासह संपूर्ण मध्य-पूर्वेत 'मन्ना'ची उत्पादने निर्यात केली जातात.
- सिंगापूर, मलेशिया, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेत जिथे भारतीय लोकसंख्या जास्त आहे अशा देशांमध्ये 'मन्ना'चा चांगला व्यवसाय आहे.
- मूळचा चेन्नईचा असलेला आर. अश्विन सर्वांत वेगाने बळी घेणारा भारतीय गोलंदाज आहे. त्याने सर्वांत कमी कसोटी सामन्यांमध्ये बळींचे दीड शतक पूर्ण केले आहे.
- अजंता मेंडिसनंतर 'कॅरम बॉल' टाकणारा अश्विन हा एकमेव गोलंदाज आहे. याशिवाय, २ शतके आणि ५ अर्धशतके नावावर असणारा अश्विन अष्टपैलू गोलंदाज आहे.

# १३ एप्रिल

## भारत-पाक सीमेवर अत्याधुनिक सुरक्षा योजना

- हल्ले, सीमेवरील घुसखोरी, तस्करी आणि अकस्मात होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांना रोखण्यासाठी केंद्र सरकारने भारत-पाक सीमेवर पाचस्तरीय सुरक्षा योजना (कॉम्प्रिहेन्सिव्ह बॉर्डर मॅनेजमेंट सिस्टिम) लागू करण्यास मंजुरी दिली आहे.
- अत्याधुनिक उपकरणांच्या साहाय्याने वर्षभर २४ तास सीमेवर कडक नजर ठेवणारी ही योजना भारत पाकिस्तानच्या पश्चिम सीमेवर कच्छपासून काश्मीरपर्यंत २९०० किलोमीटर परिसरासाठी असेल.
- सीमेतून भारतात घुसखोरी होऊ नये यासाठी प्रत्येक ५ ते ६ किलोमीटर अंतरावर कंट्रोल रूम स्थापन केली जाणार आहे. कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास या कंट्रोल रूममधून सीमा सुरक्षा दलांना लगेच अलर्ट संदेश जारी होईल.
- युद्धक्षेत्रात पहारा ठेवणाऱ्या रडार यंत्रणेचा वापर करण्याबरोबरच सीमेवर जागोजागी अंडरग्राऊंड सेन्सर्सही बसवले जाणार आहेत.
- सीसीटीव्ही कॅमेरे तर सज्ज असतीलच, त्याचबरोबर ज्या भागात तारांचे कुंपण नाही, अशा ठिकाणी लेजर अवरोधक उपकरणेही वापरली जाणार आहेत.
- पाचस्तरीय नव्या व्यवस्थेचे वैशिष्ट्य असे की एका यंत्रणेच्या नजरेतून एखादी बाब सुटली तरी पर्यायी यंत्रणेच्या देखरेखीतून ती सुटणे शक्य नाही असे या योजनेचे सूत्र आहे.

- सीमेवर कडक देखरेखीची ही नवी योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रत्येक किलोमीटर अंतराला किमान १ कोटी रुपये खर्च होणार आहेत.
- वारंवार होणारी घुसखोरी आणि दहशतवादी हल्ले रोखण्यासाठी यापेक्षा दुसरा प्रभावी उपाय सरकारकडे उपलब्ध नाही. जम्मू व पंजाबमधे प्रस्तुत योजनेचे दोन पायलट प्रकल्प पूर्वीच सुरू झाले आहेत.
- येत्या दोन वर्षांत पश्चिम सीमेवर हे काम पूर्ण करण्याचा सरकारचा विचार आहे. योजना वेळेत पूर्ण व्हावी म्हणून ५० ते ६० खाजगी कंपन्यांची निवड करण्यात आली आहे.

---

## लॉजिस्टिक एक्स्चेंज करारास मान्यता

- दोन्ही देशांच्या सैन्याला दुरुस्ती आणि साहित्याच्या पुरवठ्यासाठी एकमेकांच्या लष्करी तळांचा वापर करण्याची परवानगी देण्याचा करार (लॉजिस्टिक एक्स्चेंज) करण्यास भारत आणि अमेरिकेन तत्त्वतः मान्यता दिली आहे.
- भारत दौऱ्यावर असलेले अमेरिकेचे संरक्षण मंत्री ऍश्टन कार्टर यांनी संरक्षण मंत्री मनोहर पर्रीकर यांच्याशी चर्चा केली. या चर्चेनंतर असा करार करण्याचे निश्चित करण्यात आले.
- मात्र अमेरिकेचे सैन्य भारतीय भूमीवर उतरून तळ ठोकेल, असा या कराराचा अर्थ नसल्याचेही दोघांनी या वेळी स्पष्ट केले.

### लॉजिस्टिक एक्स्चेंज कराराचे महत्त्व

- लॉजिस्टिक एक्स्चेंज करार झालेल्या देशांना एकमेकांच्या सैन्याला माहिती, पुरवठा आणि इतर संरक्षण सेवा पुरविता येतात.
- याचा अर्थ, आपत्तीच्या काळात मदत करणाऱ्या देशांना इंधन पुरवठा, साहित्य पुरवठा करण्यासाठी लष्करी तळांचा वापर करता येतो.

---

## केरळमध्ये आवाज करणाऱ्या फटाक्यांवर बंदी

- पुट्टींगल मंदिरातील दुर्घटनेनंतर केरळ उच्च न्यायालयाने सूर्यास्त ते सूर्योदय या दरम्यान आवाज करणाऱ्या फटाक्यांवर बंदी घालण्याचा आदेश दिला आहे.
- परवानगीशिवाय असे फटाके वाजविणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.
- पुट्टींगल मंदिरामध्ये महोत्सवादरम्यान सर्व मार्गदर्शक सूचनांचा भंग करण्यात आला होता, तसेच सुरक्षेबाबत कोणतीही काळजी घेण्यात आली नव्हती.

---

# १४ एप्रिल

## 'नाम' या ई-ट्रेडिंग मंचाचे उद्घाटन

- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५व्या जयंतीच्या मुहुर्तावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'नाम' या ई-ट्रेडिंग मंचाचे उद्घाटन झाले.
- राष्ट्रीय कृषी बाजारपेठ (नाम) योजनेंतर्गत देशातील ८ राज्यांमधील २१ घाऊक कृषी बाजारपेठांचा/मंडई एकत्रित ऑनलाईन मंच स्थापन करण्यात आला आहे.
- सरकारच्या राष्ट्रीय कृषी योजनेंतर्गत मार्च २०१८पर्यंत देशातील ५८५ नियंत्रित बाजारपेठांचे एकत्रीकरण केले जाणार आहे.
- मंचासाठी सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर गुजरात, तेलंगणा, राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, हरियाना, झारखंड आणि हिमाचल प्रदेश या आठ राज्यांची निवड करण्यात आली आहे.
- एकत्रित ऑनलाईन मंचामुळे शेतकऱ्यांना चांगला परतावा मिळेल आणि ग्राहकांनादेखील स्थिर दराने उत्पादने उपलब्ध होण्यास मदत होईल. तसेच यामुळे विक्री प्रक्रिया व किंमत प्रक्रिया पारदर्शक होईल.
- ऑनलाईन बाजारपेठ स्थापन झाल्यानंतरदेखील कृषी उत्पादनांची बाजारपेठेत किंवा मंडईत विक्री सुरु राहील, परंतु ऑनलाईन बाजारपेठेमुळे व्यवहार खर्च कमी होईल.
- शिवाय, सर्व बाजारपेठांसाठी एकच परवाना मिळेल, गुणवत्ता चाचणी सुरु राहील आणि देशभरात एकच कर आकारला जाईल.

- सर्व बाजार समित्यांना जोडण्याच्या 'नाम' प्रकल्पाची घोषणा गेल्या वर्षी जुलैमध्ये करण्यात आली होती. त्यानंतर यंदाच्या अर्थसंकल्पात त्यासाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूदही करण्यात आली.
- शेतकऱ्यांना या ई-ट्रेडिंग व्यासपीठावरून तृणधान्य, कडधान्य, तेलबिया, मसाल्याचे पदार्थ २१ उत्पादनांची विक्री करता येणार आहे.

---

## 'ग्रामोदय से भारत उदय' मोहिमेचा शुभारंभ

- भारतीय घटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंती दिनानिमित्त, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महू येथील एका जाहीर सभेत 'ग्रामोदय से भारत उदय' मोहिमेचा शुभारंभ केला.
- १४ ते २४ एप्रिल २०१६ दरम्यान होणाऱ्या 'ग्रामोदय से भारत उदय' मोहिमेत गावात करायच्या विकास कामांवर लक्ष केंद्रीत करण्यात येईल, असे पंतप्रधानांनी सांगितले.
- या वर्षीचा केंद्रीय अर्थसंकल्प शेतकरी आणि खेडेगावांना समर्पित असल्याचे ते म्हणाले. विकास उपक्रमांचा केंद्रबिंदू ग्रामीण विकास असला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

---

## भारत आणि बांगलादेश दरम्यान सामंजस्य करार

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत, भारत आणि बांगलादेश दरम्यान, सप्टेंबर २०११मध्ये मत्स्य व्यवसाय

आणि संबंधित क्षेत्रांमधील द्विपक्षीय सहकार्याबाबत, सामंजस्य करारावर झालेल्या स्वाक्षऱ्याबाबत माहिती देण्यात आली.

- या सामंजस्य करारामुळे भारत आणि बांगलादेशमधील मैत्रीपूर्ण संबंध मजबूत झाले असून मत्स्यव्यवसाय तसेच संबंधित क्षेत्रात सहमतीने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीद्वारे सहकार्य विकासाला चालना मिळाली आहे.
- हा सामंजस्य करार पाच वर्ष अंमलात राहणार आहे. हा करार रद्द करण्याच्या हेतूबाबत दोन्ही बाजू किमान ६ महिने आधी पूर्व लेखी सूचना देत नाहीत तोवर दोन्ही बाजूंच्या संमतीने हा सामंजस्य करार आणखी कालावधीसाठी वाढवता येऊ शकेल.

### भारत आणि युएई दरम्यान मानवी तस्करीबाबत करार

- तसेच या बैठकीत भारत आणि संयुक्त अरब अमिराती दरम्यान मानवी तस्करीला प्रतिबंध करणे आणि त्याच्याशी लढा देण्याबाबत सहकार्य करण्यासाठीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यासाठी मंजूरी देण्यात आली.
- या सामंजस्य करारामुळे दोन्ही देशांतील मैत्रीचे बंध अधिक दृढ होतील आणि मानवी तस्करी विशेषतः स्त्रिया आणि मुलांच्या तस्करीशी संबंधित प्रतिबंध, सुटका, पुन्हा ताब्यात घेणे आणि परत पाठवणी या मुद्दयांबाबत द्विपक्षीय सहकार्यात वाढ होईल.

---

## आयजीएनसीएचे संचालक मंडळ बरखास्त

- राजधानीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय कला केंद्राचे (आयजीएनसीए) संचालक मंडळ केंद्र सरकारने तडकाफडकी बरखास्त करून वीस सदस्यांच्या नव्या संचालक मंडळाची नियुक्ती केल्याची घोषणा केली.
- ज्येष्ठ पत्रकार राम बहादूर राय यांची संस्थेच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राय यांच्या अध्यक्षतेखालील संस्थेचे संचालक मंडळ प्रथमच संपूर्णपणे बदलण्यात आले आहे.
- तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी नोव्हेंबर १९८५ मध्ये भारतीय कलांना प्रोत्साहन देण्यासाठी ही संस्था स्थापन केली व तिला इंदिरा गांधी यांचे नाव दिले.
- चिन्मय घरेखान यांच्या अध्यक्षतेखालील बरखास्त संचालक मंडळात कपिला वात्स्यायन, नमिता गोखले, फिरोज गुजराल, कुलभूषण खरबंदा, शोभना नारायण, सलमान हैदर, सुभाष पाणी, नयनज्योत लाहिरी आदी संचालक होते.

# १५ एप्रिल

## देशातील पहिली भारत सागर परिषद

- देशातील पहिल्या भारत सागर परिषदेचे उद्घाटन १४ एप्रिल रोजी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते गोरेगाव येथील 'एक्झिबिशन सेंटर'मध्ये झाले.
- सागरी क्षेत्रातील विविध विभागात उपलब्ध असणाऱ्या मोठ्या गुंतवणूक संधीकडे संभाव्य गुंतवणुकदारांना आकर्षित करणे हे ३ दिवसीय भारत सागरी परिषदेचे लक्ष्य आहे.
- देशातील ७५०० किलोमीटरचा सागरी मार्ग आणि १४ हजार किलोमीटर लांबीच्या देशांतर्गत जलमार्गाच्या विकासासाठी राबवल्या जाणाऱ्या सागरमाला प्रकल्पाचा राष्ट्रीय आराखडा यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते जाहीर करण्यात आला.

### 'सागरमाला' प्रकल्प

- देशाच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावरील सर्व बंदरे जोडून समुद्रामार्गे होणारी वाहतूक आणि व्यापाराला; तसेच जलमार्गांना ऊर्जितावस्था आणण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारने 'सागरमाला' प्रकल्पाचा निर्णय घेतला होता.
- बंदरांचा विकास हा प्रकल्पाचा केंद्रबिंदू असून, त्याद्वारे पायाभूत सुविधा निर्माण करत व्यापारात वाढ करून विकास साधण्याचा उद्देश आहे.
- हा प्रकल्प पाच वर्षांत पूर्ण करण्याचा निर्धार केंद्र सरकारने केला आहे. या प्रकल्पात चार लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे.

**ही योजना चार महत्त्वपूर्ण मुद्दयांवर आधारित आहे.**

- देशांतर्गंत मालवाहतूकीचा खर्च कमी करण्यासाठी बहुआयामी वाहतूक व्यवस्था
- आयात तसेच निर्यात केलेल्या मालाच्या वाहतूकीचा वेळ आणि खर्च यात कपात करणे
- मोठे उद्योग किनाऱ्याजवळ उभारुन त्यांना लागणारा खर्च कमी करणे आणि
- बंदरांजवळ वेगळे उत्पादन समूह उभारुन निर्यात स्पर्धात्मकतेत सुधारणा करणे.

**‘सागरमाला’चा परिणाम**

- बंदरांना जोडण्यासाठी इंडियन पोर्ट रेल कॉर्पोरेशन स्थापन
- परदेशांशी व्यापार वाढवण्यासाठी अनेक प्रक्रिया सोप्या
- संरक्षण तसेच जहाजबांधणीच्या व्यवसायासाठी परवाना पद्धत सोपी
- शिपयार्डनाही पायाभूत सुविधांचा दर्जा मिळणार

## मॉस्कोमध्ये रिक परिषद

- रशिया, भारत आणि चीनचा (रिक) समावेश असलेली ही परिषद १८ एप्रिलला मॉस्कोला होणार असून, यामध्ये परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांच्यासह रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्जी लाव्हरोव्ह आणि चीनचे परराष्ट्रमंत्री वँग यी उपस्थित राहणार आहेत.

- या परिषदेदरम्यान तिन्ही परराष्ट्र मंत्र्यांमध्ये विविध प्रादेशिक आणि अफगाणिस्तान, सीरिया, युक्रेनसह आंतरराष्ट्रीय मुद्यांवर त्रिपक्षीय चर्चा होणे अपेक्षित आहे.
- याशिवाय स्वराज या लाव्हरोव्ह आणि वँग यी यांच्याबरोबर स्वतंत्रपणे द्वीपक्षीय चर्चा करतील. याशिवाय आंतरराष्ट्रीय दहशतवादाला तोंड देण्याच्या उपायांवरही तिन्ही मंत्र्यांमध्ये चर्चा होईल.
- याशिवाय, संयुक्त राष्ट्रसंघ, ब्रिक्स, जी-२० आणि शांघाय सहकार्य संघटना अशा आंतरराष्ट्रीय संस्थांच्या चौकटीमध्ये एकमेकांमधील सहकार्य वाढविण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

**‘रिक‘चे महत्त्व**

- रशियाचे तत्कालीन पंतप्रधान येवगेनी प्रायमाकोव्ह यांच्या १९९८मधील भारतभेटीदरम्यान या संकल्पनेचा उदय झाला.
- सोविएत महासंघाच्या विघटनानंतर अमेरिकेला तोडीस तोड जागतिक शक्ती निर्माण करण्याचा यामागील उद्देश होता.
- ब्रिक्स परिषदेत (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका) ‘रिक’ परिषदेतील तीन प्रमुख देश असल्याने ‘ब्रिक्स’चा गाभा म्हणून या परिषदेकडे पाहिले जाते.

## सम-विषम प्रणालीचा दुसरा टप्पा

- राजधानीतील रस्त्यावरील वाहतुकीचे नियमन करणाऱ्या 'आप' सरकारच्या बहुचर्चित सम-विषम प्रणालीचा दुसरा टप्पा १५ एप्रिलपासून सुरू झाला.
- पुढील पंधरा दिवस सम-विषम प्रणालीनुसार वाहतुकीचे नियमन केले जाणार आहे.
- वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी परिवहन विभागाने स्वयंसेवकांच्या १२० तुकड्या नेमल्या असून, त्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास दोन हजार रुपयांपर्यंतचा दंड ठोठावू शकतात.
- शहरातील मुख्य दोनशे ठिकाणांवर हे स्वयंसेवक नेमले जाणार असून, दोन हजार वाहतूक पोलिसांनादेखील रस्त्यावर उतरविण्यात आले आहे.

---

## सर्वाधिक रेमिटन्स येणाऱ्या देशांच्या यादीत भारत प्रथम

- मागील वर्षी विदेशातील नागरिकांकडून भारतात येणाऱ्या पैशामध्ये (रेमिटन्स) तब्बल १ अब्ज डॉलरची घट झाली आहे. रेमिटन्समध्ये २००९ पासून झालेली ही सर्वांत जास्त घट आहे.
- तरीही विदेशी नागरिकांकडून सर्वाधिक पैसा (रेमिटन्स) येणाऱ्या देशांच्या यादीत भारत याही वर्षी प्रथम स्थानी राहिला आहे. जागतिक बँकेने याबाबतची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे.
- जगभरातील देशांच्या तुलनेत अधिक पैसा भारतात आला आहे. भारताने वर्ष २०१५मध्ये ६९ अब्ज डॉलर रेमिटन्ससह आंतरराष्ट्रीय पातळीवर आघाडीचे स्थान कायम राखले आहे.

- भारताशिवाय गेल्या वर्षी चीन (६४ अब्ज डॉलर), फिलिपाईन्स (२८ अब्ज डॉलर), मेक्सिको (२५ अब्ज डॉलर) आणि नायजेरियामध्ये (२१ अब्ज डॉलर) सर्वाधिक रेमिटन्स दाखल झाला आहे.
- सर्व देशांच्या एकुण रेमिटन्समध्येदेखील १.७ टक्क्यांची घट झाली आहे. यंदा जागतिक रेमिटन्सेसचा आकडा ५९२ अब्ज डॉलरवरुन ५८१.६ अब्ज डॉलरवर पोचला आहे.

---

# १६ एप्रिल

## गुगलची आणखी नऊ रेल्वे स्थानकांवर वाय-फाय सेवा

- तंत्रज्ञानात आघाडीवर असलेल्या 'गुगल'ने रेल्वेच्या 'रेलटेल'च्या सहकार्याने आणखी नऊ रेल्वे स्थानकांवर वेगवान आणि मोफत वाय-फाय सेवा सुरू केली आहे.
- पुणे, भुवनेश्वर, भोपाळ, रांची, रायपूर, विजयवाडा, काचिगुडा (हैदराबाद), एर्नाकुलम जंक्शन (कोची) आणि विशाखापट्टण या स्थानकांवर आता ही सेवा मिळेल.
- मुंबई सेंट्रल स्थानकावर प्रथम ही सेवा सुरू झाली आणि आता आणखी नऊ स्थानके त्यात सामील करण्यात आली आहेत. त्यामुळे सुमारे १५ लाख प्रवाशांना या सेवेचा दररोज फायदा मिळेल.
- रेल्वेच्या सुमारे शंभर अतिगर्दीच्या स्थानकांवर अशी वाय-फाय सेवा सुरू करण्याचा गुगलचा प्रयत्न आहे.

---

## सुशीला कर्की नेपाळच्या पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश

- नेपाळच्या अध्यक्षपदी आणि संसदेच्या सभापतिपदी महिलांची निवड झाल्यानंतर अवघ्या काही महिन्यांनंतर सुशीला कर्की यांनी नेपाळच्या पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश म्हणून सूत्रे स्वीकारली.

- नेपाळच्या घटना परिषदेने कर्की यांचे नाव मुख्य न्यायाधीशपदासाठी निश्चित केले असले तरी त्यांच्या नियुक्तीस संसदेच्या नियुक्ती समितीने परवानगी दिल्यानंतर त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली जाणार आहे.
- काही तांत्रिक कारणांमुळे संसदेच्या नियुक्ती समितीची अद्याप स्थापना करण्यात आलेली नाही, त्यामुळे कर्की यांची प्रभारी मुख्य न्यायाधीश म्हणून तात्पुरती नियुक्ती नेपाळ सरकारने केली आहे.
- नेपाळचे मावळते मुख्य न्यायाधीश कल्याण श्रेष्ठा हे निवृत्त झाल्यामुळे त्यांच्या जागी कर्की यांची निवड करण्यात आली आहे.
- कर्की यांनी अद्याप पद आणि गोपनीयतेची शपथ घेतलेली नाही. कर्की यांनी वाराणसीतील बनारस हिंदू विद्यापीठातून राज्यशास्त्रात पदव्युत्तर पदवी संपादन केली आहे.
- ऑक्टोबर २०१५मध्ये विद्यादेवी भंडारी यांची नेपाळच्या पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून निवड झाली होती, तर नेपाळच्या संसदेच्या सभापतिपदी माओवादी नेत्या ओन्सारी घार्ती मगर यांची निवड करण्यात आली होती.
- राज्यघटना अस्तित्वात आल्यानंतर स्थापन करण्यात आलेल्या नव्या सरकारतर्फे ही निवड करण्यात आली.

---

## विजय मल्ल्या यांचा पासपोर्ट स्थगित

- मनी लॉंडरिंगप्रकरणी चौकशी सुरू असलेल्या उद्योगपती विजय मल्ल्या यांचा पासपोर्ट (डिप्लोमॅटिक पासपोर्ट) सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) विनंतीवरून केंद्र सरकारने चार आठवड्यांसाठी स्थगित केला आहे.

- 'ईडी'कडून तीन वेळा समन्स बजावूनही मल्ल्या हजर झालेले नाहीत, त्यामुळे मल्ल्यांचा पासपोर्ट रद्द करण्याची मागणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) केली होती.
- त्याशिवाय पासपोर्ट ॲक्ट १९६७ नुसार पासपोर्ट रद्द का करू नये याबाबत एका आठवड्यात खुलासा देण्याचे आदेश मल्ल्यांना देण्यात आले आहेत.
- दोन मार्च रोजी लंडनला जाताना मल्ल्या यांनी राज्यसभा खासदार असल्याने मिळालेल्या डिप्लोमॅटिक पासपोर्टचा वापर केल्याचा संशय आहे.
- पासपोर्ट कायद्यानुसार, डिप्लोमॅटिक पासपोर्ट असणाऱ्या व्यक्तीच्या नेहमीच्या आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी आवश्यक कागदपत्रे जमा केली जातात व ज्यावेळी तो रद्द करण्याची मागणी केली जाते, तेव्हा पासपोर्ट आणि कागदपत्रे रद्द केली जातात.

---

## दक्षिण जपानला जोरदार भूकंपाचा धक्का

- दक्षिण जपानला १६ एप्रिल रोजी बसलेल्या जोरदार भूकंपाच्या धक्क्यामुळे अनेक ठिकाणी घरे कोसळली असून, ढिगाऱ्यांखाली गाडले गेलेल्यांच्या शोधासाठी मोठी मोहीम उघडण्यात आली आहे.
- या मोठ्या भूकंपाच्या धक्क्यात नऊ जण मृत्युमुखी पडले असून, शेकडो जण जखमी झाले आहेत. भूकंपामुळे अनेक ठिकाणी आग लागली, तर अनेक रस्ते बंद झाले आहेत.
- माशिकी शहराजवळ या भूकंपाचा केंद्रबिंदू होता. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ६.५ एवढी होती.

- जपानमधील अतिवेगवान रेल्वेगाडी या भूकंपाच्या धक्क्यामुळे लोहमार्गावरून घसरली असून, कुमामोटो शहरातील अनेक प्रसिद्ध इमारतींचे मोठे नुकसान झाले आहे.
- भूकंपामुळे नुकसान झालेल्या भागात मोठ्या प्रमाणात मदतकार्य सुरू असून, मृत्युमुखी पडलेल्यांच्या आणि जखमी झालेल्यांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

# १७ व १८ एप्रिल

## भारताला अझलन शाह हॉकी स्पर्धेचे उपविजेतेपद

- प्रतिष्ठेच्या अझलन शाह हॉकी स्पर्धेच्या अंतिम सामन्यामध्ये खेळ उंचावण्यात भारताला अपयश आल्याने अखेरीस उपविजेतेपदावरच समाधान मानावे लागले.
- ऑस्ट्रेलियाच्या बलाढ्य संघाने सामन्याच्या पहिल्या मिनिटापासूनच भारतीय संघावर वर्चस्व राखले आणि ४-० असा दणदणीत विजय मिळविला.
- यजमान मलेशियाविरुद्ध गोलांचा धडाका लावत भारतीय संघाने ६-१ असा एकतर्फी विजय मिळवत अंतिम फेरी गाठली होती.

---

## टाटाच्या दोन कंपन्यांना ९४ कोटी डॉलरचा दंड

- टाटा समूहाच्या दोन कंपन्यांना अमेरिकेच्या 'ग्रँड ज्युरी'ने ९४ कोटी डॉलरचा (६२०० कोटी रुपये) दंड ठोठावला आहे.
- अमेरिकेतील एपिक सिस्टम्सने दाखल केलेल्या 'ट्रेड सिक्रेट' खटल्यात टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) आणि टाटा अमेरिका इंटरनॅशनलला कॉर्पोरेशनविरोधात निकाल दिला आहे.
- टाटा समूहाच्या दोन्ही कंपन्यांना एपिक सिस्टम्सच्या सॉफ्टवेअरची चोरी केल्याच्या आरोपाखाली २४ कोटी डॉलरची नुकसान भरपाई व ७० कोटी डॉलरचे दंडात्मक नुकसान देण्याचा आदेश ग्रँड ज्युरीने दिला आहे.

- ऑक्टोबर २०१४ मध्ये एपिक सिस्टम्सने टाटा समुहाच्या कंपन्यांविरोधात एपिकचे ट्रेड सिक्रेट्स, गोपनीय माहिती, कागदपत्रे आणि डेटा चोरल्याचा आरोप करत खटला दाखल केला होता.

---

## दीपा कर्माकरचा टॉप्स योजनेमध्ये समावेश

- ऑलिंपिक पात्रता स्पर्धेत भारतीय जिम्नॅस्ट दीपा कर्माकरने सर्वांगीण कामगिरी करीत आर्टिस्टिक गटात स्थान मिळवले.
- रिओ येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत दीपाने तिच्या आवडत्या व्हॉल्ट प्रकारात सर्वांत खडतर मानला जात असलेला प्रोदुनोवा प्रकारात १५.०६६ गुण मिळवले.
- अनइव्हन बारमध्ये तिने ११.७०० आणि फ्लोअर प्रकारात १२.५६६ गुण अशी माफक प्रगती केली. तिने एकंदर ५२.६९८ गुण मिळवले.
- दोन वर्षांपूर्वी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ब्रॉंझपदक जिंकत दीपाने इतिहास घडवला होता. त्याचबरोबर जागतिक स्पर्धेची अंतिम फेरी गाठलेली पहिली भारतीय स्पर्धक ठरण्याचाही मान मिळवला होता.
- भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या टॉप्समध्ये (टार्गेट ऑलिंपिक पोडियम स्कीम) दीपाचा समावेश तातडीने करण्यात आला आहे.
- तिला प्रशिक्षणासाठी लगेचच ३० लाख रुपयेही देण्याचे ठरले आहे. टॉप्सअंतर्गत केंद्रीय क्रीडा खाते २०१६ तसेच २०२०च्या ऑलिंपिकमधील संभाव्य पदकविजेत्यांना साह्य करीत आहे.

- ऑलिंपिकला पात्र ठरलेली दीपा पहिली भारतीय महिला जिम्नॅस्ट आहे. ऑलिंपिकच्या जिम्नॅस्टिक स्पर्धेत दीपाच्या निमित्ताने ५२ वर्षांनंतर भारतीय सहभागी होणार आहे.
- १९५२च्या ऑलिंपिक स्पर्धेमध्ये दोन, १९५६च्या तीन तर १९६४च्या ऑलिंपिक स्पर्धेमध्ये सहा भारतीयांचा सहभाग होता

---

# १९ एप्रिल

## जितेंद्र आणि अनिल कपूर यांना राज्य सरकारचे पुरस्कार

- ज्येष्ठ अभिनेते जितेंद्र यांना राज्य सरकारचा जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. तर विशेष योगदान पुरस्कार अभिनेते अनिल कपूर यांना घोषित करण्यात आला आहे.
- हिंदी चित्रपट क्षेत्राच्या उत्कर्षाकरता ज्यांनी दीर्घकाळ आपले आयुष्य व्यतित केले. तसेच चित्रपट सृष्टीत अभिनय, संगीत, निर्मिती, दिग्दर्शन गुणांनी त्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली, अशा ज्येष्ठ व्यक्तीला राजकपूर जीवनगौरव व राजकपूर विशेष योगदान पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.
- जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप ५ लाख रुपये तर विशेष योगदान पुरस्कारासाठी ३ लाख रुपयांची रक्कम देण्यात येते.
- सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने जितेंद्र आणि अनिल कपूर यांची पुरस्कारासाठी निवड केली.

### जितेंद्र

- 'गीत गाता चल'या चित्रपटाद्वारे नायक म्हणून जितेंद्र यांनी हिंदी रुपेरी पडद्यावर पदार्पण केले.
- जितेंद्र यांनी जवळपास २००हून अधिक सिनेमांमध्ये काम केले आहे. त्यातील १००हून अधिक चित्रपट हे बॉक्स ऑफिसवर हिट ठरले आहेत.
- जिने की राह, हमजोली हे सन १९६८ ते १९७१ या काळातील त्यांचे सर्वाधिक यशस्वी ठरलेले चित्रपट आहेत.

- हिंदी चित्रपटसृष्टीबरोबरच हॉलिवूड चित्रपटसृष्टीमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटविणारे अनिल कपूर जन्माने मुंबईकर आहेत.

**अनिल कपूर**

- अनिल कपूर यांनी हमारे तुम्हारे (१९७९) उमेश मेहरा यांच्या हिंदी चित्रपटातून लहान भूमिकेमधून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. तेजाब (१९८८) हा चित्रपट त्यांचा सर्वाधिक ब्लॉगबस्टर चित्रपट ठरला.
- अभिनयाबरोबर निर्माता म्हणून अनिल कपूर यांनी बधाई हो बधाई, माय वाईफ्स मर्डर, गांधी माय फादर, शॉर्ट कट, नो प्राब्लेम सारख्या चित्रपटांची निर्मिती केली आहे.

---

## व्यंगचित्रकार शि. द. फडणीस आणि वसंत सरवटे यांना 'जीवनगौरव'

- 'व्यंगदर्शन २०१६' या व्यंगचित्रकारांच्या संमेलनात ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस आणि वसंत सरवटे यांना व्यंगचित्रकलेतील अमूल्य योगदानाबाबत 'जीवनगौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- सन्मानचिन्ह, मानपत्र, ५० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते हे दोन्ही पुरस्कार प्रदान करण्यात आले.

- ज्येष्ठ व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या अखिल भारतीय व्यंगचित्रकार संस्था 'कार्टूनिस्ट कम्बाईन' संस्थेतर्फे हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे.
- या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे यांच्या हस्ते होणार झाले.

---

## विजय मल्ल्या विरोधात अजामीनपात्र अटक वॉरंट जारी

- ९ हजार कोटींचे कर्ज थकवलेल्या 'किंगफिशर'चे प्रमुख विजय मल्ल्या यांना विशेष न्यायालयाने अजामीनपात्र अटक वॉरंट बजावले आहे.
- याआदेशामुळे मल्ल्या यांच्या विरोधात इंटरपोलचा रेड कॉर्नर ऍलर्ट जारी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.
- आयडीबीआय बँकेकडून मिळालेल्या कर्जातील ४३० कोटी रुपये मल्ल्या यांनी परदेशात संपत्ती खरेदी करण्यासाठी वापरल्याचा 'ईडी'चा आरोप किंगफिशरने फेटाळून लावला.
- या 'ईडी'च्या दाव्याला किंगफिशर एअरलाईन्सने आव्हान दिले होते. मात्र न्यायालयाने किंगफिशरची याचिका फेटाळून लावली आहे.
- आतापर्यंत १८ मार्च, २ एप्रिल आणि ९ एप्रिल अशा तीन वेगवेगळ्या तारखा देऊनही चौकशीला मल्ल्या उपस्थित राहिले नाहीत.
- सर्वोच्च न्यायालयाने मल्ल्या यांना ते व त्यांच्या कुटुंबीयांच्या देशात आणि परदेशात असलेल्या सर्व मालमत्तेचे तपशील २१ एप्रिलपर्यंत जाहीर करण्याचे आदेश दिले आहेत.

---

# २० एप्रिल

## जोकोविच आणि सेरेनाला लॉरियस पुरस्कार

- क्रीडा क्षेत्रातील 'ऑस्कर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या १६व्या लॉरियस जागतिक क्रीडा पुरस्कार सोहळ्यात टेनिसपटूंनी बाजी मारली.
- वर्षातील सर्वोत्कृष्ट पुरुष आणि महिला क्रीडापटूचा पुरस्कार सर्बियाचा नोवाक जोकोविच आणि अमेरिकेची सेरेना विल्यम्सने पटकावला. दोघांनी तिसऱ्यांदा या पुरस्कारावर नाव कोरले.
- गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियन आणि अमेरिकन ओपनसह विम्बल्डन ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकणाऱ्या जोकोविचने सलग दुसऱ्यांदा आणि एकूण तिसऱ्यांदा (२०१२, २०१५ आणि २०१६) लॉरियस पुरस्कार मिळवला.
- २०१५मध्ये तीन ग्रँडस्लॅम मिळलेल्या सेरेनाने यापूर्वी २००३ व २०१० हा पुरस्कार मिळविला आहे.
- 'ऑल ब्लॅक्स' या न्यूझीलंडच्या जगज्जेत्या रग्बी संघाने सर्वोत्कृष्ट संघाचा पुरस्कार पटकावला. सर्वोत्कृष्ट पुनरागमनासाठीचा पुरस्कार न्यूझीलंडचा रग्बीपटू डॅन कार्टरला मिळाला.
- तीन वेळचे माजी फॉर्म्युला वन जगज्जेते ऑस्ट्रियाचे निकी लॉड यांना लॉरियस जीवनगौरव पुरस्काराने गौरवण्यात आले.
- व्यावसायिक फुटबॉलपटू हॉलंडचे जोहान क्रीफ यांना मरणोत्तर 'स्पिरीट ऑफ स्पोर्ट्स' पुरस्काराने गौरविण्यात आले. क्रीफ यांचे मार्च महिन्यात निधन झाले.

- अन्य खेळांमध्ये जागतिक क्रमवारीतील द्वितीय गोल्फर अमेरिकेचा जॉर्डन स्पीथ याला 'ब्रेक थ्रू ऑफ द इयर' आणि ऑलिम्पिक ट्रायथलन सुवर्णविजेता जर्मनीचा जैन फ्रोडैनोला 'अॅक्शन स्पोर्ट्स अॅवॉर्ड' प्रदान करण्यात आला.

---

## पुलित्झर पुरस्कार जाहीर

- अमेरिकी पत्रकारितेतील उत्कृष्ट कार्याचा गौरव करण्यासाठी देण्यात येणाऱ्या पुलित्झर पुरस्कार विजेत्यांमध्ये यंदा 'द असोसिएटेड प्रेस' (एपी) व 'रॉयटर्स' या वृत्तसंस्था तसेच 'न्यूयॉर्क टाइम्स' या वृत्तपत्राचा समावेश आहे.
- पुरस्कारांचे हे १००वे वर्ष असून न्यूयॉर्कच्या कोलंबिया विद्यापीठात झालेल्या कार्यक्रमात या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली.
- आग्नेय आशियाई देशांतून अमेरिकी बाजारात येणाऱ्या मासे आणि अन्य सागरी अन्नाच्या व्यापारात मोठ्या प्रमाणात कामगारांना वेठीला धरले जाते. त्या गैरप्रकारांवर एपीने १० लेखांच्या मालिकेतून प्रकाश टाकला होता.
- त्यानंतर २००० कामगारांची सुटका होऊन ही यंत्रणा सुधारण्यासाठी बरेच प्रयत्न झाले. या कार्याबद्दल एपीला पुलित्झर पुरस्कार जाहीर झाला. आहे.
- तर युरोपीय देशांतील निर्वासितांचे प्रश्न छायाचित्रणाच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडल्याबद्दल रॉयटर्स आणि न्यूयॉर्क टाइम्सला पुरस्कार मिळाला.
- पश्चिम आफ्रिकेतील इबोलाच्या साथीबद्दलच्या वृत्तांकनासाठी न्यूयॉर्क टाइम्सला आंतरराष्ट्रीय वृत्तांकनाचा पुरस्कार मिळाला.
- लॉबींच्या दबावाचा आढावा घेणाऱ्या वार्तांकनासाठी न्यूयॉर्क टाइम्सच्याच एरिक लिप्टन या पत्रकाराने पटकावला.

- तर याच वृत्तपत्रासाठी फ्रीलान्सर फोटोग्राफर म्हणून काम करणाऱ्या डॅनियल बेरेहुलक याने इबोलासंदर्भातील फ्युचर फोटोग्राफीबद्दल या पुरस्कारावर मोहोर उमटवली.
- न्यूयॉर्क टाइम्सला आजवर त्यांच्या पत्रकारितेच्या उज्ज्वल परंपरेबद्दल ११७ पुलित्झर पारितोषिके मिळाली आहेत. यंदा त्यात आणखी तीन पुरस्कारांची भर पडली.
- कॅलिफोर्नियातील सॅन बर्नार्डिनो येथे इस्लामी दहशतवाद्यांनी केलेल्या हत्याकाडांच्या वृत्तांकनासाठी ‘लॉस एंजल्स टाइम्स’ला पुलित्झर पुरस्कार मिळाला.
- लॉस एन्जल्स टाइम्सने लेख तसेच टीकात्मक लेखाबद्दल दोन पारितोषिके पटकावली, याशिवाय अमेरिकेतील दि वॉल स्ट्रीट जर्नल आणि वॉशिंग्टन पोस्टलाही प्रत्येकी एक पारितोषिक मिळाले.
- ‘द बोस्टन ग्लोब’, ‘टॅम्पा बे’ आणि ‘द न्यूयॉर्कर’ या नियतकालिकांनाही प्रत्येकी दोन पुरस्कार मिळाले.
- कादंबरीसाठीच्या पुलित्झर पुरस्कार अँटोनी डोएर यांना ('ऑल दि लाइट वुई कॅननॉट सी' या कादंबरीसाठी) मिळाला.
- तर, चरित्रासाठीचा पुलित्झर पुरस्कार डेव्हिड कर्टझर यांना त्यांच्या 'द पोप अँड मुसोलिनी: दि सिक्रेट ऑफ पायस इलेवन्थ अँड दि राइज ऑफ फॅसिझम इन युरोप'या पुस्तकासाठी जाहीर झाला.

# २१ एप्रिल

## राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पाला मान्यता

- राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पाच्या अंमलबजावणीला केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली. सुमारे ३६८० कोटी रुपयांची ही केंद्रीय योजना आहे.
- दोन टप्प्यात हा प्रकल्प लागू केला जाईल. जलसंसाधन, नदीविकास आणि गंगा पुनरुज्जीवन मंत्रालयाच्या अखत्यारीत स्वतंत्र संस्था म्हणून एनडब्ल्यूआयसीच्या निर्मितीची यात तरतूद आहे.
- राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पामुळे जल-हवामान-विषयक माहिती एकत्रित करण्यासाठी मदत होईल. वास्तव काळाच्या आधारावर त्याचे विश्लेषणही केले जाईल.
- याआधीचा जलविज्ञान प्रकल्प १३ राज्यांपुरताच मर्यादित होता मात्र आता या प्रकल्पाची व्याप्ती देशभर आहे.
- प्रकल्पाच्या पन्नास टक्के रक्कम म्हणजे १८४० कोटी रुपये जागतिक बँकेकडून कर्ज रुपात मिळणार आहे. केंद्र सरकार हे कर्ज फेडणार आहे. उर्वरित ५० टक्के रक्कम केंद्रीय सहाय्यतेच्या रुपात मिळेल.

---

## सुधा मूर्ती यांना 'सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील' पुरस्कार

- रयत शिक्षण संस्थेच्या वतीने दिला जाणारा या वर्षीचा 'रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील' पुरस्कार शिक्षण आणि विविध क्षेत्रांत मोठे योगदान देणाऱ्या सुधा मूर्ती यांना जाहीर झाला आहे.

- सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी जाहीर केला.
- दरवर्षी गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला लक्ष्मीबाई पाटील यांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण केले जाते. अडीच लाख रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

---

## मितसुबिशी मोटर्सच्या अडचणीत वाढ

- मितसुबिशी मोटर्सने मोटारींच्या इंधनक्षमतेची खोटी आकडेवारी जाहीर केल्याचे मान्य केल्यानंतर जपानी अधिकाऱ्यांनी कंपनीच्या प्रमुख कार्यालयावर छापा टाकला आहे.
- कंपनीच्या ओकाझाकी कार्यालयाची तपासणी करण्यात आली आहे. कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी ६ लाखांपेक्षा जास्त मोटारींच्या इंधनक्षमतेची खोटी आकडेवारी ग्राहकांना सांगितली आहे.
- कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना मोटारींच्या चार मॉडेल्सची इंधनक्षमता ५ ते १० टक्क्यांनी वाढवून सांगितल्याचे कंपनीने मान्य केले आहे.
- आपली चूक मान्य करीत मितसुबिशीचे अध्यक्ष तेत्सुरो आईकावा यांनी पत्रकार परिषदेत जपानी पद्धतीनुसार मान वाकवून माफी मागितली.
- या बातमीनंतर कंपनीचे शेअर १५ टक्क्यांनी कोसळून दशकभराच्या नीचांकी पातळीवर पोचले आहेत. याविषयी जपान सरकारने मितसुबिशीकडून संपुर्ण अहवाल मागविला आहे.

- काही महिन्यांपुर्वी दुसरी आंतरराष्ट्रीय कंपनी फोक्सवॅगनच्या मोटारींमधील उत्सर्जन चाचणीचा गैरव्यवहार समोर आला होता.

---

## ग्रेट बॅरियर रीफ धोक्यात

- दरवर्षी पर्यटनाच्या माध्यमातून दरवर्षी सुमारे ३.९० अब्ज डॉलरची कमाई करून देणारे ग्रेट बॅरियर रीफ (प्रवाळांचे थर) पूर्णपणे नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.
- कॉरल समुद्रातील हा रीफसमूह निम्मा नष्ट झाला असून केवळ सात टक्के प्रवाळांचाच रंग कायम असल्याचे ऑस्ट्रेलियन संशोधकांनी म्हटले आहे.
- समुद्राचे तापमान वाढत असल्यामुळे रीफसमूहाला धोका निर्माण झाला आहे. हे तापमान कमी झाले नाही तर रीफसमूह पूर्णपणे नष्ट होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.
- संशोधकांनीच्या अंदाजानुसार सद्यस्थितीत जवळपास ५० टक्के रीफसमूह यापूर्वीच नष्ट झाला आहे किंवा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.
- समुद्राचे पाणी गरम होणे, प्रदूषण यामुळे प्रवाळामध्ये राहणारे जीव बाहेर येतात. परिणामी प्रवाळांचा रंग बदलतो. काही आठवड्यांत प्रवाळांमध्ये राहणारे जीव नष्ट होऊ शकतात.
- त्यामुळे प्रवाळ पांढरे पडतात. प्रवाळांमधील रंग उडण्याच्या प्रक्रियेमुळे मोठ्या प्रमाणात ते नष्ट होऊ शकतात.
- ग्रेट बॅरियन रीफ ऑस्ट्रेलियाच्या ईशान्य किनाऱ्यावर २३०० किलोमीटर अंतरावर पसरला आहे.

# २२ एप्रिल

## एफडीआय खेचण्यात भारताने चीनच्या पुढे

- परकीय गुंतवणूक खेचून आणण्याच्या स्पर्धेत भारताने चीनला मागे टाकले आहे. २०१५मध्ये भारतात विविध क्षेत्रातील ६३ अब्ज डॉलर्सच्या एफडीआय गुंतवणूकीच्या प्रकल्पांची घोषणा झाली आहे.
- भारतातील एफडीआय प्रकल्पांची संख्या ८ टक्क्यांनी वाढून ६९७ झाली आहे. फॉक्सकॉन आणि सन एडीसन या कंपन्यांनी भारतामध्ये मोठया प्रमाणात गुंतवणूक करण्याची तयारी दाखवली आहे.
- फॉक्सकॉन भारतामध्ये ५ अब्ज डॉलर्स आणि सन एडीसन ४ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे. कोळसा, तेल, नैसर्गिक वायू आणि अपारंपारिक ऊर्जा या क्षेत्रांमध्ये मोठया प्रमाणावर एफडीआय येणार आहे.
- २०१५ मध्ये संपूर्ण जगामध्ये भारताने पहिल्यांदा एफडीआय गुंतवणूकीत आघाडी घेतली होती. भारताने त्यावेळी अमेरिका आणि चीनपेक्षा जास्त एफडीआय गुंतवणूक खेचून आणली होती.
- २०१५मधील एफडीआय गुंतवणूकीच्या दहा सर्वोत्तम ठिकाणांमध्ये पाच ठिकाणे भारतातील आहेत. परकीय गुंतवणूकदारांनी गुजरातमध्ये १२.४ अब्ज तर महाराष्ट्रामध्ये ८.३ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणूकीची तयारी दाखवली आहे.

---

## उत्तराखंडमधील राष्ट्रपती राजवट बरखास्त

- उत्तराखंडमधील लोकनियुक्त सरकार राष्ट्रपती राजवट लागू करून खाली खेचण्याचा केंद्र सरकारचा निर्णय तेथील उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला.
- न्यायालयाने कॉंग्रेस नेते हरीश रावत यांना उत्तराखंड सरकारचा कार्यभार सांभाळण्यास सांगताना २९ एप्रिलला सभागृहात बहुमत सिद्ध करण्याचे निर्देशही दिले.
- उत्तराखंडमध्ये २७ मार्चला लागू करण्यात आलेली राष्ट्रपती राजवट सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या निर्णयांच्या विरोधात असल्याचेही उत्तराखंड उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.
- उत्तराखंडमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याच्या निर्णयाला कॉंग्रेसचे नेते हरीश रावत यांनी आव्हान दिले होते.
- ९ बंडखोर कॉंग्रेस आमदारांच्या अपात्रतेविषयी न्यायालयाने सांगितले, की एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जाणे हे घटनात्मक पाप आहे. आमदारांना सदस्यत्व गमावून या पापाची किंमत मोजावी लागेल. बंडखोर आमदारांच्या याचिकेवर आता २३ एप्रिलला सुनावणी होणार आहे.

---

## शी जिनपिंग चीनचे लष्करप्रमुखही

- चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग हे आता चीनचे लष्करप्रमुखही (कमांडर इन चीफ) झाले आहेत.
- शी यांच्याकडे याआधीच कम्युनिस्ट पक्षाचे महासचिवपद (जनरल सेक्रेटरी) आणि ‘पीपल्स लिबरेशन आर्मी’मधील लष्करी अधिकाऱ्यांची सर्वोच्च संस्था असलेल्या सेंट्रल मिलिटरी कमिशनचे अध्यक्षपद आहे.

- दक्षिण चिनी समुद्रामधील बेटांच्या मालकीहक्कावरुन सुरु असलेला राजनैतिक संघर्ष अधिकाधिक आक्रमक होण्याची चिन्हे असतानाच शी यांनी लष्करप्रमुखपदाची सूत्रे स्वीकारण्यासंदर्भात घेतलेल्या या निर्णयाचे जागतिक राजकारणामध्ये मोठे पडसाद उमटण्याची शक्यता आहे.

---

## सर्वात सुंदर महिला म्हणून जेनिफर ॲनिस्टनची निवड

- पीपल मॅगझिनने २०१६ या वर्षातील सर्वात सुंदर महिला म्हणून हॉलिवूड अभिनेत्री जेनिफर ॲनिस्टनची निवड केली आहे.
- पीपलच्या कव्हरपेजवर ४७ वर्षीय जेनिफरचे छायाचित्र प्रसिद्ध झाले आहे. अमेरिकन टेलिव्हीजनवरील 'फ्रेंडस' या शो मधील रेचल हे तिचे पात्र गाजले. या शो मधील भूमिकेमुळे जेनिफरला नाव, प्रसिद्धी मिळाली.

---

# २३ व २४ एप्रिल

## डॉ. नरेंद्र जाधव, मेरी कोम यांची राज्यसभेवर नियुक्ती

- प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव, ऑलिम्पिक पदकविजेती खेळाडू मेरी कोम, माजी क्रिकेटपटू नवज्योतसिंग सिद्धू, ज्येष्ठ पत्रकार स्वपन दासगुप्ता, मल्याळम चित्रपट अभिनेते सुरेश गोपी आणि भारतीय जनता पक्षाचे नेते सुब्रमण्यम स्वामी यांची राष्ट्रपतींनी राज्यसभेवर नियुक्ती केली आहे.
- राज्यसभेतील राष्ट्रपती नियुक्त १० पैकी ७ सदस्यांच्या जागा रिक्त झाल्याने त्यापैकी ६ जागांवर ही नियुक्ती करण्यात आली आहे.
- सातव्या जागेसाठी इंडिया टीव्हीचे रजत शर्मा, झी टीव्हीचे सुभाषचंद्र आणि ज्येष्ठ पटकथालेखक सलीम खान यांच्या नावांची चर्चा सुरू होती.
- राष्ट्रपती नियुक्त १० सदस्यांपैकी दोन खासदार नोव्हेंबर २०१५मध्ये, तर पाच सदस्य २ एप्रिल रोजी निवृत्त झाले. तसेच उरलेले तिघे सदस्य २०१८ साली निवृत्त होत आहेत.

---

## भूपेंद्र कैंथोला यांची एफटीआयआयच्या संचालकपदी नियुक्ती

- १९८९च्या तुकडीचे भारतीय माहिती सेवेचे (आयआयएस) अधिकारी भूपेंद्र कैंथोला यांची पुण्यातील फिल्म अँड टेलिव्हिजन ऑफ इंडियाच्या (एफटीआयआय) संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.
- कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने (डीओपीटी) एका आदेशाद्वारे त्यांची नियुक्ती केली असून, ती तीन वर्षांसाठी असेल.

- सध्या प्रेस इन्फर्मेशन ब्युरोचे संचालक प्रशांत पाठराबे यांच्याकडे एफटीआयआयच्या प्रभारी संचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार होता.
- संस्थेच्या निमायक मंडळाचे अध्यक्ष गजेंद्र चौहान व इतर सदस्यांच्या निवडीच्या विरोधात विद्यार्थ्यांनी १३९ दिवस संप पुकारला होता. त्यादरम्यान, संस्थेच्या संचालक पदाची जबाबदारी पाठराबे यांच्याकडे देण्यात आली होती.

---

## अजित जोशी यांना सर्वोत्कृष्ट जिल्हाधिकारी पुरस्कार

- मूळचे महाराष्ट्रातील सोलापूरचे व सध्या चंडिगडचे जिल्हाधिकारी असलेल्या अजित जोशी यांना 'जनधन' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'सर्वोत्कृष्ट जिल्हाधिकारी' म्हणून पुरस्कार देण्यात आला.
- एक लाख रुपये रोख, सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.
- राष्ट्रीय स्तरावर लोकप्रशासनात उत्कृष्ट व नावीन्यपूर्ण काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना दरवर्षी २१ एप्रिल रोजी 'नागरी सेवादिनी' 'पंतप्रधान पुरस्कार' देऊन गौरविण्यात येते.
- केंद्र शासनाच्या 'जनधन', 'स्वच्छ भारत अभियान', 'स्वच्छ विद्यालय' आणि 'मृदा परीक्षण पत्र' (सॉईल हेल्थ कार्ड) अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांना विविध श्रेणींमध्ये पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## मनोज वाजपेयीला दादासाहेब फाळके पुरस्कार

- अभिनेता मनोज वाजपेयी याला हंसल मेहता दिग्दर्शित अलिगड या चित्रपटामधील अभिनयासाठी सर्वोत्तम अभिनेता श्रेणीतील दादासाहेब फाळके पुरस्काराने (समीक्षकांची निवड) गौरविण्यात येणार आहे.
- अलिगड चित्रपटामधील प्राध्यापक रामचंद्र सिरस यांची मध्यवर्ती भूमिका साकारल्याबद्दल वाजपेयी याला दादासाहेब फाळके पुरस्काराने भूषविण्यात येणार आहे.
- हा राष्ट्रीय पुरस्कार विजेता अभिनेता आता 'ट्रॅफिक' या आगामी चित्रपटामध्ये एका पोलिस हवालदाराची भूमिका साकारत आहे.

## गुलाम अली यांना हनुमंत पुरस्कार प्रदान

- पाकिस्तानी गझल गायक गुलाम अली यांना संगीत क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल गुजरातमधील एका कार्यक्रमात हनुमंत पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.
- वास्तविक गुलाम अली यांच्या गायनाच्या कार्यक्रमाने या पर्वाचे उद्घाटन होणार होते, पण त्यांचा कार्यक्रम ऐन वेळी काही अपरिहार्य कारणांनी रद्द करण्यात आला होता.
- गुलाम अली आणि अन्य पाच जणांना न्यासातर्फे हनुमंत पुरस्कार देण्यात आले. तर बॉलीवूड कलाकार धर्मेंद्र यांच्यासह तिघांना नटराज पुरस्कार देण्यात आला.

## सिंहस्थ कुंभमेळ्यास उज्जैनमध्ये सुरवात

- विविध आखाड्यांच्या साधू-महंतांनी ‘जय श्रीराम’चा जयघोष करीत क्षिप्रा नदीत २२ एप्रिल रोजी शाही स्नान केले आणि महिनाभर चालणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यास उज्जैनमध्ये २२ एप्रिलपासून सुरवात झाली.
- बारा वर्षांनी येणाऱ्या सिंहस्थ कुंभपर्वासाठी देश व परदेशांतूनही भाविक प्राचीन उज्जैननगरीत दाखल झाले आहेत.
- तृतीयपंथींचा सहभाग हे यंदाच्या कुंभमेळ्यात वैशिष्ट्य म्हणता येईल. त्यांनी आखाड्याची स्थापना केली असून, क्षिप्रा नदीवरील गंधर्व घाटावर ९ मेच्या पर्वणीला शाही स्नानाचा लाभ घेणार असल्याचे जाहीर केले आहे.

## विजय मल्ल्या यांचा पासपोर्ट रद्द

- विविध बँकांनी कर्जापोटी दिलेले ९,४०० कोटी बुडविणाऱ्या ‘किंगफिशर एअरलाइन्स’चा मालक विजय मल्ल्या यांचा पासपोर्ट रद्द करण्यात आला आहे.
- पीएमएलए कायदा २००२ नुसार अजामीनपात्र वॉरंटचा विचार करता परराष्ट्र मंत्रालयाने मल्ल्या यांचा पासपोर्ट रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.
- मल्ल्या यांच्यावर व्यवहारातील अनियमितता आणि बेहिशेबी मालमत्ता जमविल्याचा आरोप आहे. मल्ल्या यांचा राजकीय पासपोर्ट अंमलबजावणी संचालनालयाच्या शिफारशीनंतर निलंबित केला होता.

- विजय मल्ल्या सध्या ब्रिटनमध्ये असून अंमलबजावणी संचालनालयासमोर हजर राहण्यास ते टाळाटाळ करत आहेत.

---

## सलमान खान रिओसाठी सदिच्छा दूत

- भारतीय ऑलिंपिक संघटनेने (आयओए) रिओ ऑलिंपिकसाठी सदिच्छा दूत म्हणून अभिनेता सलमान खान याची निवड केली.
- सलमान ५० वर्षांचा असून, देशभरात बॉडीबिल्डिंग करणाऱ्यांसाठीही तो प्रेरणास्थान आहे.
- सुलतान या आगामी चित्रपटात त्याने कुस्तीपटूची भूमिका केली आहे. लहान गावातून आंतरराष्ट्रीय पातळीवर यश मिळविणाऱ्या स्पर्धकाची कथा यात आहे.

---

# २५ एप्रिल

## पुनर्गुंतवणूक विभागाचे नामकरण

- केंद्रीय पुनर्गुंतवणूक विभागाचे नामकरण करण्यात आले आहे. हा विभाग आता 'डिपार्टमेंट ऑफ इन्व्हेस्टमेंट अँड पब्लिक ॲसेट मॅनेजमेंट' अर्थात 'दीपम' म्हणून ओळखला जाईल.
- यंदाच्या अर्थसंकल्पात नमूद केल्याप्रमाणे चालू आर्थिक वर्षात पुनर्गुंतवणुकीच्या माध्यमातून ५६ हजार ५०० कोटी रुपये उभारणीचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आहे.
- एकूण रकमेपैकी ३६००० कोटी रुपये सरकारी कंपन्यांच्या अल्प हिस्साविक्रीतून तर, उर्वरित २०,५०० कोटी रुपये नफ्यात आणि तोट्यात असणाऱ्या कंपन्यांच्या विक्रीतून उभारण्यात येतील.

---

## दत्तू भोकनळ रिओ ऑलिंपिकसाठी पात्र

- भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेला दत्तू भोकनळ याने रिओ (ब्राझील) ऑलिंपिकसाठी नौकानयन (रोइंग) क्रीडा प्रकारात पात्रता मिळविली आहे.
- कोरिया येथे २०१६ 'फिसा' (FISA) आशिया अँड ओसेनिया कॉन्टिनेंटल ऑलिंपिक पात्रता स्पर्धेमध्ये एकेरी पुरुष (सिंगल स्कल) त्याने हे यश मिळविले आहे.
- सैन्यदलात भरती झाल्यानंतर त्याने रोइंगचे प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्याने विविध स्पर्धांमध्ये पदकांची कमाई केलेली आहे.

- २०१५मध्ये बीजिंग (चीन) येथे झालेल्या आशियाई नौकानयन आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये ७:१८:४१ अशी वेळ नोंदवत रौप्य पदकाची कमाई केली होती.
- दत्तू भोकनळ हा पुण्यात द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त इस्माईल बेग यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो.

---

## संदीप तोमर रिओ ऑलिंपिकसाठी पात्र

- आशियाई विजेत्या संदीप तोमरने पहिल्या ऑलिंपिक पात्रता कुस्ती स्पर्धेत ब्राँझपदकावर कब्जा करताना रिओ ऑलिंपिकसाठी पात्रताही मिळविली.
- संदीप हा ऑलिंपिक कोटा जिंकलेला भारताचा चौथा कुस्तीगीर आहे. संदीपने हा पराक्रम फ्रीस्टाइल प्रकारातील ५७ किलो गटात केला.
- मंगोलियातील उलनबटोर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत प्रत्येक गटात पहिले तीन कुस्तीगीर ऑलिंपिकसाठी पात्र ठरले.
- उपांत्य लढतीत संदीपचा अझरबैझानच्या हसान झादा याच्याकडून पराभव झाला. परंतु ऑलिंपिक कोट्यासाठी झालेल्या लढतीत संदीपने मोल्दोवाच्या अलेक्झांड्रू चिर्तोका याचा १०-० असा सहज पाडाव केला.

---

## सबसिडीचा त्याग करण्यात महाराष्ट्र अग्रेसर

- घरगुती गॅस सिलिंडरवर देण्यात येणाऱ्या शासकीय अनुदानाचा (सबसिडी) त्याग करण्याबाबतच्या पंतप्रधानांच्या आवाहनाला देशात सर्वाधिक प्रतिसाद महाराष्ट्रातून मिळाला आहे.

- महाराष्ट्रातील एकूण १६,४२,८१४ नागरिकांनी या अनुदानाचा त्याग केला आहे.
- घरगुती गॅसच्या वापरासाठी नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सिलिंडरवर शासनातर्फे अनुदान देण्यात येते. त्यापोटी केंद्र सरकारला मोठा वित्तीय भार सहन करावा लागतो.
- या अनुदानाची गरज नसलेल्या नागरिकांनी अनुदानाचा त्याग करावा, असे आवाहन करताना देशाचे प्रधानमंत्री मोदी यांनी देशभरात 'गिव्ह इट अप' मोहीम राबविली होती.
- देशात एकूण १४.५४ कोटी नागरिक एलपीजी गॅसधारक आहेत. त्यापैकी १ कोटीहून अधिक नागरिकांनी या अनुदानाचा त्याग केला आहे.
- महाराष्ट्रानंतर उत्तर प्रदेश (१२,५३,२४२), दिल्ली (७,२७,३७४), कर्नाटक (६,९७,७१०) आणि तामिळनाडू (६,४७,९८५) याप्रमाणे पहिल्या पाच राज्यांची क्रमवारी आहे.

---

## राधिका आपटे आंतरराष्ट्रीय सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार

- मराठी व बॉलीवूड इंडस्ट्री गाजविणारी मराठमोळी अभिनेत्री राधिका आपटे हिला न्यूयॉर्कमधील ट्रिबेका फिल्म फेस्टिव्हलमध्ये आंतरराष्ट्रीय श्रेणीतला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.
- सहा दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेल्या 'मॅडली' या शॉर्टफिल्ममधील भूमिकेसाठी तिला हा पुरस्कार मिळाला आहे.

- 'ट्रिबेका' फिल्म फेस्टिव्हलमध्ये एखाद्या भारतीय अभिनेत्रीने सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे.

---

# २६ एप्रिल

## एसीबीच्या महासंचालकपदी सतीश माथूर

- आयपीएसच्या १९८१च्या तुकडीतील अधिकारी सतीश माथूर यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली.
- तसेच या विभागाचे अतिरिक्त महासंचालक संजय बर्वे यांच्याकडे राज्य गुप्तचर विभागाचे आयुक्तपद सोपविण्यात आले, संजय बर्वे १९८७च्या तुकडीचे अधिकारी आहेत.
- 'एसीबी'चे प्रमुख होण्यापूर्वी माथूर महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण आणि कल्याण मंडळाचे महासंचालक होते.
- नॅशनल सिक्युरिटी गार्डमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या सतीश माथूर यांनी विधी व तांत्रिक तसेच पोलीस गृहनिर्माण व कल्याण या विभागाचे महासंचालक म्हणूनही काम केले आहे.
- तसेच त्यांनी केंद्रात प्रतिनियुक्तीवर असताना एअर इंडियामध्ये तसेच सीबीआयमध्येही काम केले.
- सीबीआयमध्ये असताना मुंबईतील १९९३च्या बॉम्बस्फोट तपासात त्यांचा सहभाग होता. ते काही काळ पुण्याचे आयुक्त होते व मुंबईत वाहतूक पोलीस सहआयुक्त हे पदही त्यांनी भूषवले आहे.

---

## भारताचा नेमबाज मैराज खानला रौप्यपदक

- भारताचा नेमबाज मैराज अहमद खानने रिओ दि जानिरो (ब्राझील) शहरात सुरू असलेल्या आयएसएसएफ नेमबाजी विश्वचषकात रौप्यपदक प्राप्त केले.
- मैराजने पुरुषांच्या स्कीट सुवर्णपदक सामन्यात स्वीडनच्या मार्कस स्वेनसनचा शूटआउट टायब्रेकरवर २-१ ने पराभव केला. 'स्कीट' सामन्यातील हे भारताचे पहिले पदक आहे.
- अंतिम फेरीत मैराज आणि मार्कस या दोघांनी १६ पैकी १५, अशी कामगिरी करून सुवर्णपदकासाठी दावेदारी पक्की केली होती. ज्यात मार्कसने बाजी मारली.
- या स्पर्धेत इटलीचा टमारो कसान्द्रो तिसऱ्या क्रमांकावर राहिला. त्याला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

---

## ध्वनी प्रदूषणाच्या बाबतीत मुंबई सर्वांत पुढे

- केंद्रीय पर्यावरण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) अहवालानुसार ध्वनी प्रदूषणाच्या बाबतीत मुंबई सर्वांत पुढे असल्याची माहिती समोर आली आहे.
- मुंबईनंतर लखनौ आणि हैदराबादचा क्रमांक असून दिल्ली चौथ्या स्थानावर आहे. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावल्याने ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यात दिल्लीला यश मिळाल्याचे अहवालात म्हटले आहे.
- वाहनांच्या आवाजाशिवाय, जनरेटर, कार्यालयातील यंत्रे, विमाने, औद्योगिक आणि बांधकामाच्या कामातून निर्माण होणारे आवाज आदींच्या आवाजामुळे शहरांमधील ध्वनी प्रदूषणामध्ये वाढ होत आहे.

- दिवसा ५५ डेसीबल आणि रात्रीच्या वेळी ४५ डेसीबल एवढ्या आवाजाची मर्यादा ओलांडली तर मानवी आरोग्यावर त्याचे विपरित परिणाम होतात.
- त्यामध्ये स्वभावातील आक्रमकता, उच्च रक्तदाब, ऐकू कमी येणे, झोपेमध्ये अडथळा आदी प्रकारच्या तक्रारी उद्भवू शकतात.
- सीपीसीबीचा हा अहवाल सरकारला ध्वनी प्रदूषणासंदर्भातील धोरणे निश्चित करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

---

## चीनचे बंडखोर नेते डोल्कन इसा यांचा व्हिसा रद्द

- चीनचे बंडखोर उइघूर नेते डोल्कन इसा यांचा व्हिसा भारताने रद्द केला आहे. इसा यांना दहशतवादी संबोधत चीनने त्यांना व्हिसा देण्याच्या निर्णयावर तीव्र आक्षेप नोंदविला होता.
- हिमाचल प्रदेश येथे होणाऱ्या मानवाधिकार परिषदेसाठी इसा उपस्थित राहणार होते. मात्र, त्यांच्याविरुद्ध रेड कॉर्नर नोटीस असल्याचे लक्षात आणून दिल्यावर परराष्ट्र मंत्रालयाने तो रद्द करण्याचा निर्णय घेतला.
- व्हिसा रद्द होऊनही त्यांनी भारतात प्रवेश केल्यास त्यांना अटक करून चीनच्या ताब्यात दिले जाईल, असे भारताने स्पष्ट केले आहे.

### उइघूर

- उइघूर हा चीनमधील मुस्लिम समुदाय असून, चीन सरकार कायम दडपशाही करत असल्याच्या आरोपामुळे त्यांच्यात कायम संघर्ष सुरू असतो.

- उइघूर हे सांस्कृतिकदृष्ट्या मध्य आशियाच्या अधिक जवळ असून, त्यांच्या भाषेचेही तुर्कीशी साधर्म्य आहे. अनेक उइघूर नेत्यांना चीनने दहशतवादी म्हणून घोषित केले आहे.

# २७ व २८ एप्रिल

## ‘हार्ट ऑफ एशिया’ परिषदेला सुरुवात

- युद्धजर्जर अफगाणिस्तानमध्ये गुंतवणूक वाढवून विकासप्रक्रिया वेगाने करण्यासाठी ‘हार्ट ऑफ एशिया’ ही परिषद २७ एप्रिलपासून सुरू होत असून, या परिषदेचे यजमानपद भारताकडे आहे.
- पाकिस्तानचे परराष्ट्र सचिव एझाझ अहमद चौधरी यांच्यासह अनेक देशांचे प्रतिनिधी या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.
- दहशतवाद आणि मूलतत्त्ववाद या दोन आव्हानांचा सामना करण्याबाबत या परिषदेत चर्चा अपेक्षित आहे.
- अफगाणिस्तानमध्ये कायमस्वरूपी विश्वासाचे वातावरण निर्माण करण्याच्या प्रक्रियेला वेग आणणे आणि त्यासाठी विविध उपाययोजना करणे, हा परिषदेचा गाभा असणार आहे.
- अफगाणिस्तानच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांच्याबरोबर ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि गुंतवणुकीचे करार करण्याबाबतही उपस्थित देशांमध्ये चर्चा होईल.

### भारताची भूमिका

- अफगाणिस्तानमधील स्थैर्य आणि सुरक्षेसाठी आशियामधील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करावेत आणि त्यांची आश्रयस्थाने नष्ट करावेत, ही भारताची प्रमुख मागणी आहे.

- दहशतवाद्यांना असणारी आर्थिक रसद तोडून त्यांना मिळणारा पाठिंबा थांबविण्याबरोबरच मूलतत्त्ववादी आणि फुटीरतावादी यांच्याविरोधातही कारवाई करण्याबाबत भारत आग्रही आहे.
- अफगाणिस्तानमध्ये संपर्क आणि दळणवळण जाळे विकसित करून आंतरराष्ट्रीय बाजाराशी त्यांना जोडणे, हा परिस्थिती सुधारण्याचा चांगला मार्ग असल्याचेही भारताचे म्हणणे आहे.

### हार्ट ऑफ एशिया

- २०११पासून 'हार्ट ऑफ एशिया' या परराष्ट्रमंत्री स्तरावरील परिषदेला सुरवात झाली असून, आतापर्यंतच्या सर्व परिषदांमध्ये भारताने ठोस भूमिका मांडली आहे.
- या परिषदेमध्ये अफगाणिस्तान, अझरबैजान, चीन, भारत, इराण, कझाकस्तान, किरगिझीस्तान, पाकिस्तान, रशिया, सौदी अरेबिया, ताजिकीस्तान, तुर्कस्तान, तुर्कमेनिस्तान आणि संयुक्त अरब अमिराती या चौदा देशांचा समावेश आहे.
- तसेच, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, डेन्मार्क, इजिप्त, फिनलंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, नॉर्वे, पोलंड, स्पेन, स्वीडन, ब्रिटन, अमेरिका आणि युरोपीय युनियनचा परिषदेला पाठिंबा आहे.

## सचिन तेंडुलकर यांची खासदार निधीतून सोलापूर जिल्ह्याला मदत

- मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांनी खासदार निधीतून सोलापूर जिल्ह्याच्या विकासाला हातभार लावला आहे. या जिल्ह्यातील तीन गावांना विकासासाठी ५६ लाख रुपयांचा निधी दिला आहे.
- बार्शी तालुक्यातील इर्लेवाडी येथील माध्यमिक शाळेला वर्ग खोल्या बांधण्यासाठी तेंडुलकर यांनी ४ वर्ग खोल्यांच्या बांधकामासाठी १९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.
- दक्षिण सोलापूर तालुक्यातील कोन्हाळी गावातील अंगणवाडी, रस्ते, पाण्याची टाकी व पथदिव्यांसाठी तेंडुलकर यांनी १२ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.
- करमाळा तालुक्यातील पोमलवाडी व पसिरातील रस्त्यांच्या कामांसाठी तेंडुलकर यांनी २५ लाख रुपयांचा निधी दिला आहे.

---

## ई-कॉमर्समध्ये ॲमेझॉन इंडिया दुसऱ्या स्थानी

- ई-कॉमर्स क्षेत्रासंदर्भातील मार्च महिन्यातील आकडेवारीनुसार, ॲमेझॉन इंडिया ही स्नॅपडीलला मागे टाकत सर्वाधिक उत्पादनांची विक्री करणारी दुसऱ्या क्रमांकाची कंपनी ठरली आहे.
- पहिल्या क्रमांकावर अद्यापही फ्लिपकार्टचे वर्चस्व कायम आहे. त्यामुळे परदेशातील ॲमेझॉनचे भारतीय बाजारपेठेत वाढणारे महत्त्व अधोरेखित होत आहे.

- गेल्या महिन्यात माल वितरणाचा विचार केला असता, फ्लिपकार्टची बाजारपेठेत ३७ टक्के हिस्सेदारी होती. तर ॲमेझॉन इंडिया व स्नॅपडीलची हिस्सेदारी अनुक्रमे २४ व १५ होती.
- गेल्या महिन्यात ऑनलाईन किरकोळ विक्री करणाऱ्या कंपन्यांनी दिवसाला ८ ते ९ लाख वस्तूंचे वितरण केले आहे.
- ॲमेझॉनने भारतीय व्यवसायात जानेवारी महिन्यापासून ६,७०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. गेल्यावर्षी ॲमेझॉन इंडियाची २५० टक्के दराने वाढ झाली आहे.

---

## सुदर्शन पटनाईक यांना आंतरराष्ट्रीय वाळूशिल्प स्पर्धेत सुवर्णपदक

- प्रख्यात भारतीय वाळू शिल्पकार सुदर्शन पटनाईक यांनी मॉस्कोमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय वाळूशिल्प स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले.
- त्यांनी या स्पर्धेत अहिंसा आणि शांततेचा संदेश देणाऱ्या महात्मा गांधींची १५ फुटांची कलाकृती साकरली होती.
- या यशानंतर रशियातील भारताचे राजदूत पंकज सारन यांनी पटनाईक यांचे अभिनंदन केले. या स्पर्धेत जगभरातील २० वाळू शिल्पकार सहभागी झाले होते.

---

## कन्हैया कुमारचा ‘बिहार ते तिहार’ प्रवास

- जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील (जेएनयू) विद्यार्थी संघटनेचा नेता कन्हैया कुमार आता पुस्तकरूपाने आपला जीवनप्रवास मांडणार आहे. 'बिहार ते तिहार' असे या पुस्तकाचे नाव आहे.
- हैदराबादमधील वेमुला प्रकरणानंतर जेएनयूमधील विद्यार्थी नेता कन्हैया कुमार याच्या विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.
- कन्हैयाची सुटका झाल्यानंतर तो पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात तो आपल्या भाषणात जोरदार टीकास्त्र सोडत आहे.
- बिहारमधील एका छोट्या खेड्यातून पुढे आलेल्या या विद्यार्थी नेत्याचा जीवनप्रवास देशातील विद्यार्थ्यांसमोर मांडण्याचा प्रयत्न जुग्गरनॉट प्रकाशन करणार आहे.

# २९ एप्रिल

## 'आयआरएनएसएस-१जी'चे यशस्वी प्रक्षेपण

- भारताची संपूर्ण स्वदेशी बनावटीची स्थितिदर्शक यंत्रणा (जीपीएस : ग्लोबल पोझिशनिंग सिस्टिम) २८ एप्रिल रोजी पूर्णत्वास गेली.
- भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) श्रीहरीकोटातील सतीश धवन स्पेस सेंटरवरून 'इंडियन रिजनल नॅव्हिगेशन सॅटेलाईट सिस्टिम' (आयआरएनएसएस) मालिकेतील सातवा उपग्रह अवकाशात यशस्वीरीत्या सोडला.
- 'इस्रो'ने आयआरएनएसएस-१जी या उपग्रहाचे ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपक 'पीएसएलव्ही सी-३३'द्वारे अंतराळात यशस्वी प्रक्षेपण केले. सात उपग्रहांच्या मालिकेतील हा शेवटचा उपग्रह आहे.
- हा उपग्रह साधारण महिन्याभराच्या कालावधीत पूर्णपणे कार्यान्वित होईल. भारताची स्थितिदर्शक यंत्रणा अगोदरच कार्यान्वित झाली आहे. मात्र, या सातव्या उपग्रहामुळे ती अधिक कार्यक्षम होणार आहे.
- आता सर्व उपग्रह, जमिनीवरील रिसिव्हर यंत्रणा, नियंत्रण कक्ष यांच्या चाचण्या येत्या काही दिवसांत पूर्ण होतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सिस्टीमला 'नाविक' असे नाव बहाल केले आहे.

## अशी आहे यंत्रणा

- या यंत्रणेत पृथ्वीभोवती ३६ हजार किलोमीटर उंचीवरून भ्रमण करणारे सात उपग्रह, भूभागावरील देखरेख आणि नियंत्रण करणारे 'नेटवर्क' आणि लाभार्थीचा प्रत्येकी एक छोटा रिसिव्हर यांचा समावेश होतो.
- प्रत्येक उपग्रहाचे वजन सुमारे १४०० किलो असून, त्यावरचे सौर पॅनेल १४०० वॉट ऊर्जा पुरवतील.
- यातील प्रत्येक उपग्रहासाठी १५० कोटी, प्रक्षेपकासाठी प्रत्येकी १३० कोटी आणि भूभागावरील यंत्रणेसाठी एकूण ३०० कोटी रुपये खर्च आला आहे.

## स्वदेशी जीपीएसची वैशिष्ट्ये

- एकूण सात उपग्रह कार्यान्वित
- उपग्रहाकडून मिळणारी माहिती स्मार्टफोनवर थेटपणे वापरता येणार
- २० मीटर अंतरापर्यंत अचूक माहिती मिळू शकणार
- व्याप्ती : संपूर्ण भारताचा भूभाग, तसेच बाहेरील १५ किलोमीटरचा पल्ला
- अचूक वेळेसाठी प्रत्येक उपग्रहात आण्विक घड्याळे
- १२ महिने २४ तास सेवा मिळणार
- उपयुक्त आयुष्य १२ वर्षे

## मिळणाऱ्या सेवा

- स्थितिदर्शन, मार्गनिरीक्षण, मानचित्रण,
- दळणवळण, सर्वेक्षण, नकाशे तयार करणे
- विमाने, नौका यांना दिशादर्शनासाठी
- हायकर किंवा पर्यटकांना दिशादर्शनासाठी
- लष्करी उपयोगासाठीच्या इक्रिप्टेड विशेष सेवा

- आपत्तीमध्ये व्यवस्थापनासाठी

## अशी काम करते यंत्रणा

- 'जीपीएस'द्वारे आपल्या ठिकाणाची माहिती अक्षांश, रेखांश व समुद्रसपाटीपासूनची उंची या तीन मितींमध्ये मिळते.
- उपग्रहाकडून आलेल्या रेडिओ संदेशाचे रिसिव्हरद्वारे विश्लेषण केले जाते आणि त्यानुसार ती व्यक्ती जमिनीपासून किती उंचीवर, कोणत्या अक्षांश-रेखांशावर आहे हे ठरविले जाते. यासाठी किमान तीन उपग्रहांचे संदेश आवश्यक असतात.
- अवकाशातील उपग्रहांच्या कक्षांची मांडणी अशी असते, की पृथ्वीवरील यंत्रणा-व्याप्त प्रदेशाच्या कोणत्याही ठिकाणापासून कोणत्याही क्षणाला या प्रणालीतील चार उपग्रह 'दिसू' शकतात. त्या ठिकाणच्या 'जीपीएस' रिसिव्हरपासून त्या चार उपग्रहांचे अंतर वेगवेगळे असते.
- उपग्रहांचे स्वतःचे ठिकाण आणि अचूक वेळ ही माहिती आणि प्रकाशाचा वेग यांच्या योगे पृथ्वीवरील रिसिव्हर उपग्रहांपासूनचे स्वतःचे अंतर याची गणना करतो.
- त्या अंतरातल्या फरकाचा उपयोग करून त्याच्यामध्ये असलेल्या संगणकाच्या साह्याने स्वतःच्या स्थानाबद्दल अचूक माहिती आणि वेळ प्राप्त होते.

## भारत पाचवा

- जगभरामध्ये स्वतःची जीपीएस यंत्रणा विकसित करणारा भारत हा पाचवा देश ठरला आहे. अमेरिकेशिवाय रशियाची ग्लोनास ही यंत्रणा कार्यान्वित आहे.

- चीन आणि जपान या देशांच्या प्रादेशिक पातळीवरील स्थितिदर्शक प्रणाली कार्यान्वित आहेत, तर युरोपीय महासंघानेही गेल्या तीन वर्षांपासून जीपीएससाठी प्रयत्न चालविले आहेत. मात्र त्यांची यंत्रणा पूर्णत्वास गेलेली नाही.

| उपग्रहांचे प्रक्षेपण | |
|---|---|
| आयआरएनएसएस-१ए | जुलै २०१३ |
| आयआरएनएसएस-१बी | एप्रिल २०१४ |
| आयआरएनएसएस-१सी | ऑक्टोबर २०१४ |
| आयआरएनएसएस-१डी | मार्च २०१५ |
| आयआरएनएसएस-१ई | २० जानेवारी २०१६ |
| आयआरएनएसएस-१एफ | १० मार्च २०१६ |
| आयआरएनएसएस-१जी | २८ एप्रिल २०१६ |

## गुजरातमध्ये सामान्य वर्गाला आरक्षण

- गुजरात सरकारने सामान्य वर्गातील आर्थिक दृष्ट्या मागासांसाठी १० टक्के आरक्षणाची २९ एप्रिल रोजी घोषणा केली.
- आर्थिकदृष्ट्या मागास वर्गाला आरक्षण देणारे गुजरात हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. या निर्णयाने सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेल्या ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेचे उल्लंघन होणार आहे.
- यामुळे सामान्य वर्गातील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्यांना सरकारी नोकरी व उच्च शिक्षणासाठी या आरक्षणाचा लाभ मिळणार आहे.

- पाटीदार समाजासह ब्राम्हण, क्षत्रिय व लोहना समाजासह इतर सामान्य वर्गातील वार्षिक उत्पन्न ६ लाखांपेक्षा कमी असणाऱ्यांना या आरक्षणाचा लाभ मिळणार आहे.
- गुजरात दिनाच्या दिवशी म्हणजे एक मे रोजी आरक्षणाची अधिसूचना जारी करण्यात येणार आहे.
- राज्यात पाटीदार समाजाने हार्दिक पटेलच्या नेतृत्वाखाली आरक्षणासाठी आंदोलन सुरू केले होते. यामुळे या समाजाला याचा लाभ घेता येणार आहे.
- एससी, एसटी आणि ओबीसीसाठी जे ४९ टक्के आरक्षण आहे त्याला हात न लावता हे आरक्षण दिले जाणार आहे.

---

## अमेरिकन काँग्रेससमोर मोदींचे भाषण

- अमेरिकेतील काँग्रेसच्या संयुक्त परिषदेत भाषण देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रित करण्यात आले आहे. अमेरिकेच्या हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजचे अध्यक्ष पॉल रायन यांनी मोदींना निमंत्रण दिले आहे.
- राजीव गांधी, पीव्ही नरसिंह राव, अटलबिहारी वाजपेयी आणि मनमोहनसिंग यांना यापूर्वी अमेरिकन काँग्रेससमोर भाषण देण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते. येथे निमंत्रित करण्यात आलेले मोदी हे भारताचे पाचवे पंतप्रधान आहेत.
- हा कार्यक्रम ८ जून रोजी होणार असून, मोदी यांचा हा सत्तेवर आल्यापासून चौथा अमेरिका दौरा ठरेल.

---

## मादाम तुसाँ संग्रहालयात मोदींचा पुतळा स्थानापन्न

- आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामांकित मादाम तुसाँ संग्रहालयात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुतळ्याचे २८ एप्रिल रोजी अनावरण करण्यात आले.
- संग्रहालयातील प्रमुख आकर्षणांपैकी एक असलेल्या 'वर्ल्ड लीडर्स' या विभागात हा पुतळा बसविण्यात आला आहे.
- महात्मा गांधी, विन्स्टन चर्चिल यांच्यापासून अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा, ब्रिटनचे पंतप्रधान डेव्हिड कॅमेरॉन, जर्मनीच्या अँजेला मार्केल, फ्रान्सचे फ्रँकाईज ओलाँद या जागतिक नेत्यांच्या बरोबरीने मोदींचा पुतळा ठेवण्यात आला आहे.

---

## उत्तेजकविरोधी नियमांच्या उल्लंघनात भारत तिसरा

- जागतिक उत्तेजकविरोधी संघटनेने (वाडा) २०१४च्या उत्तेजकविरोधी नियमांच्या उल्लंघनासंदर्भात तयार केलेल्या अहवालात भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. रशिया आणि इटली हे देश भारतापुढे आहेत.
- उत्तेजकविरोधी नियमांच्या उल्लंघनाची ९६ प्रकरणे भारतीय खेळाडूंच्या नावे नोंदली गेली असून रशिया (१४८) यात अग्रेसर आहे. त्यानंतर इटलीचा (१२३) क्रमांक लागतो.
- भारतापाठोपाठ बेल्जियम (९१), फ्रान्स (९१), तुर्की (७३), ऑस्ट्रेलिया (४९), चीन (४९), ब्राझिल (४६) आणि दक्षिण कोरिया (४३) यांचे क्रमांक पहिल्या १० मध्ये लागतात.

- भारतातील ९६ प्रकरणांमध्ये ७९ खेळाडू (५६ पुरुष व २३ महिला) हे प्रत्यक्ष स्पर्धेदरम्यान दोषी आढळले आहेत तर १३ खेळाडू (९ पुरुष व ४ महिला) हे स्पर्धाबाह्य चाचणीत दोषी ठरले आहेत.
- भारताची ऑलिम्पिकमधील पदकसंख्या पाहिली तर ती १९२०पासून अवघी २४ भरते पण गेल्या काही वर्षांत उत्तेजकांच्या बाबतीत मात्र भारत आघाडीवर असल्याचे हा अहवाल सांगतो.
- जे भारतीय खेळाडू उत्तेजक नियम उल्लंघनात सापडले आहेत त्यात ॲथलेटिक्समधील खेळाडूंचा सर्वाधिक समावेश आहे. ती २९ प्रकरणे आहेत. यातही भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. रशिया (३९) पहिल्या स्थानावर आहे.

---

# ३० एप्रिल

## लिम्काबुकमध्ये नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानची दखल

- रेवदंडा येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने १६ नोव्हेंबर २०१४ रोजी राज्यभरात राबवण्यात आलेल्या स्वच्छता अभियानाची दखल लिम्का बुक ऑफ रेकॉर्डसने घेतली आहे.
- एकाच दिवशी महाराष्ट्रातील २१ शहरांमध्ये राबविण्यात आलेल्या या अभियानात ५ हजार ६४५ किलोमीटरचे रस्ते स्वच्छ करण्यात आले होते. त्यातून सुमारे तीन टन कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली होती.
- या अभियानात राज्यभरातील २ लाख ५ हजार सदस्य सहभागी झाले होते. एकाच वेळी लोकसहभागातून राबवण्यात आलेले हे पहिले महास्वच्छता अभियान होते.
- प्रतिष्ठानच्या वतीने या विक्रमाची नोंद घेण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. लिम्का बुक ऑफ रेकार्डसने तो स्वीकारला आणि २०१६ च्या विक्रमांच्या यादीत या महास्वच्छता अभियान म्हणून नोंद केली.
- ‘लिम्का बुक’च्या ‘विकास’ (डेव्हलपमेंट) या भागातील रेकॉर्डमध्ये हे अभियान समाविष्ट करण्यात आले आहे.

## डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान

- निरूपणकार डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांनी त्यांच्या अनुयायांना अध्यात्मातून समाजसेवेचा मार्ग दाखवून दिला होता. यातूनच डॉ. नानासाहेब प्रतिष्ठानची मुहूर्तमेढ रोवली गेली होती.
- त्यांच्या पश्चात डॉ.अप्पासाहेब धर्माधिकारी यांनी समाज सुधारणेचा हा वारसा पुढे सुरू ठेवला.
- प्रतिष्ठानच्या वतीने वृक्ष लागवड व संवर्धन, रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर, प्रौढशिक्षण अभियान आणि स्वच्छता अभियान यांसारखे उपक्रम राबविण्यात आले.
- लोकांमध्ये जलसाक्षरता निर्माण व्हावी यासाठी धरण, तलाव यांची साफसफाई लोकसहभागातून करण्यात आली. गाळने भरलेले जलस्रोत स्वच्छ करण्यात आले.
- प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता मोहिमांची दखल घेऊन राज्यपाल विद्यासागर राव यांनी डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी यांची राज्याचे स्वच्छतादूत म्हणून निवड केली होती.

## सुधा सिंगचा रिओतील प्रवेश निश्चित

- मॅरेथॉनमध्ये रिओ ऑलिम्पिकसाठी प्रवेश निश्चित झालेल्या महाराष्ट्राच्या ललिता बाबरने दिल्ली येथे सुरू असलेल्या फेडरेशन कप राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेत स्वतःचाच राष्ट्रीय विक्रम मोडीत काढून ३००० मीटर स्टीपलचेसचे सुवर्ण जिंकले.
- ललिताने ९ मिनिटे २७.०९ सेकंद अशी वेळ दिली.

- तिची सहकारी सुधा सिंगनेही रिओतील प्रवेश निश्चित केला पण तिला स्टीपलचेसमध्ये रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.
- सुधाचा हा ऑलिम्पिक पात्रतेचा पहिला प्रयत्न होता आणि त्यात ती यशस्वी ठरली. सुधा सिंगला या कामगिरीनंतर १४ मेला होत असलेल्या शांघाय डायमंड लीगमध्ये खेळण्याची संधी देण्यात आली आहे.

---

## 'पीएफ'वर ८.८ टक्के व्याज

- कर्मचारी भविष्य निर्वाह निधीवर (ईपीएफ) मिळणाऱ्या व्याज दरात केंद्र सरकारने ०.१ टक्क्याने वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.
- त्यामुळे नोकरदारांना त्यांच्या पीएफवर ८.८ टक्के इतके व्याज मिळणार आहे. आधी हा व्याज दर ८.७ टक्के इतका करण्यात आला होता.
- पीएफवरील व्याज दर ८.७५ टक्क्यांवरून ८.७० टक्के केल्याने सरकारी कर्मचारी संघटनांनी त्याला तीव्र विरोध केला होता. याविरोधात आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला होता.
- त्याची दखल घेऊन केंद्र सरकारने २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी पीएफवरील व्याज दर वाढवून ८.८ टक्के करण्याचा निर्णय घेतला.
- या निर्णयाचा देशभरातील ५ कोटीपेक्षा जास्त 'पीएफ'धारकांना लाभ मिळणार आहे.

---

## कोहीमा शहर धुम्रपान मुक्त

- नागालँडची राजधानी कोहीमा शहर धुम्रपान मुक्त म्हणून घोषित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे कोहीमामध्ये यापुढे धुम्रपानावर बंदी असेल.
- कोहीमाला धुम्रपान मुक्त करण्यासाठी विविध उपायोजना करण्यात येणार आहेत. जिल्हा प्रशासन आणि पोलिसांकडून त्याची अंमलबजावणी केली जाईल.

---




© वरील नोट्सबाबत सर्व हक्क MPSC TOPPERSच्या अधीन असून, यातील कोणताही भाग MPSC TOPPERSच्या लेखी परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारे पुनर्मुद्रित किंवा पुनर्प्रकाशित करता येणार नाही. तसेच याचा व्यावसायिक स्तरावर वापर करता येणार नाही. असे करताना आढळल्यास कॉपीराईट कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येईल.